घड्याळ म्हंटल की..
विठ्ठल वॉच
नामवंत कंपन्यांची घड्याळे
मिळतील विक्री व दुरुस्ती
सुधाकर कॉम्पलेक्स,नगरपलिकेसमोर
मायणी रोड,विटा (जि.सांगली)
८२६२८३५३९१-९४२१२२१६३०

# प्रीतिसंगम

www.pritisangam.com
सातारा-सांगली-कोल्हापूर-पुणे-सोलापूर

छोटी जाहिरात मोठा प्रतिसाद
दैनिक प्रीतिसंगममध्ये छोट्या जाहिराती प्रसिद्धीसाठी देवून सहकार्य करा..
संपर्क
कराड-२२७७२५/७३५०६४२३९४
सातारा कार्यालय-९२२६३९८८१७

वर्ष २९ वे | अंक ३८६ | पाने ४ | रविवार | दि. १९ एप्रिल २०२६ | किंमत २ रूपये | R.N.I.No.MAHMAR./2001/10338 पोस्ट परवाना No./KRDDN/008/2024-2026 | फोन-२२७७२५

# काँग्रेससह विरोधी पक्षांकडून विधेयकाची भ्रूणहत्या

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा हल्लाबोल:ज्या पक्षांनी विधेयकाला विरोध केला त्यांना परिणाम भोगावे लागतील

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था:–**

**काँग्रेस आणि त्यांच्या सोबतच्या पक्षांनी नारीशक्ती वंदन विधेयकाला विरोध करत महिलांच्या अधिकारांचे भ्रूणहत्या केली. ज्या ज्या पक्षांनी महिलांच्या आरक्षणामध्ये अडथळे आणले त्यांना भविष्यात परिणाम भोगावे लागतील, त्याचबरोबर या पक्षांनी आपला खरा चेहरा जनतेसमोर आणला असे मत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना संबोधित करत आपली भूमिका मांडली.**



महिला आरक्षण आणि मतदारसंघ पुनर्रचना संबंधित १३१ वे घटनादुरुस्ती विधेयक संसदेत नामंजूर झाल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना संबोधित करत आपली भूमिका मांडली. काँग्रेसने इतिहास रचण्याची आणि महिलांच्या बाजूने उभे राहण्याची संधी गमावली असं नरेंद्र मोदी म्हणाले.

नरेंद्र मोदी म्हणाले की, आज भलेही हे विधेयक पास करण्यासाठी ६० टक्के बहुमत आमच्याकडे नसेल, परंतु देशातील कोट्यवधी महिलांची आम्हाला साथ आहे. महिलांच्या अधिकारांमध्ये येणाऱ्या प्रत्येक अडचणी आम्ही दूर करू. आमचा विश्वास दृढ आहे. आम्ही फक्त त्या वेळेची वाट पाहतोय. काल आमच्याकडे संख्याबळ नाही म्हणजे आमचा पराभव झाला असं नाही. आमचा प्रयत्न थांबणार नाही. आमच्याकडे पुढे अनेक संधी येतील आणि आम्ही हा संकल्प पूर्ण करूच.

भारतीय महिलांच्या इच्छांना रोखण्यात आले, त्यांच्या स्वप्नांचा चक्काचूर करण्यात आला. आमच्यासाठी देशहित सर्वात प्रथम आहे. पण काही लोकांसाठी पक्षहित हे सर्वात मोठे होते. त्यावेळी देशातील महिलांना त्याचे परिणाम भोगावे लागतात. यावेळीही असंच काहीतरी झाले. काँग्रेस, समाजवादी, डीएमके यांच्यामुळेही आता असेच घडले.

देशातील कोट्यवधी महिला संसदेकडे डोळे लावून बसल्या होत्या. ज्यावेळी महिलांच्या हितासंबंधी संसदेत प्रश्न उपस्थित झाला आणि त्यांच्या अधिकारांवर गदा आली त्यावेळी काँग्रेस सारख्या परिवारवादी पक्ष टाळ्या वाजवत होते.

ज्यावेळी महिलांच्या अधिकारांवर गदा येते त्यावेळी त्याचा बदला घेतला जाईल. नारीशक्ती वंदन विधेयकाला ज्या लोकांनी विरोध केला, त्यांनी महिलांना गृहीत धरण्याची चूक केली. देशातील महिलांना विरोधकांची भूमिका समजली आहे. त्याचा परिणाम आता भोगावा लागणार आहे.

नारीशक्ती वंदन बिल हे प्रत्येकाला काहीतरी देणारे होते, कुणाचेही काहीही काढून घेणारे नव्हते. गेल्या ४० वर्षांपासून प्रलंबित असलेले ते बिल होते. या माध्यमातून एकविसाव्या शतकातील महिलांना नवीन संधी देणारे आणि त्यांच्या वाटेतील अडचणी दूर करणारे होते. देशातील अर्ध्या लोकसंख्येला त्यांचा अधिकार देणारा तो प्रयत्न होता.

मतदारसंघ पुनर्रचना विधेयकामुळे महिलांच्या वाट्याला येणाऱ्या मतदारसंघांमध्ये मोठी वाढ होणार होती. परंतु काँग्रेसला ते नको असल्याने त्याला विरोध केला. काँग्रेसने 'फोडा आणि राज्य करा' हे सूत्र इंग्रजांपासून घेतलं आणि त्याचाच वापर त्यांनी यावेळी केला.

मतदारसंघ पुनर्रचनेवर काँग्रेस आणि टीएमसी, डीएमके, समाजवादी पक्षाने सातत्याने अफवा पसरवल्या. या विधेयकाच्या माध्यमातून सर्व राज्यांच्या संसदेतील प्रतिनिधित्वामध्ये समान वाढ होणार होती. परंतु, विरोधकांच्या विरोधामुळे हे होऊ शकलं नाही.

डीएमकेला मोठी संधी होती. या विधेयकामुळे अधिक तामिळ लोक हे संसदेत आले असते. परंतु डीएमकेने त्याला विरोध केला. समाजवादी पक्षाने तर राम मनोहर लोहिया यांच्या विचारसरणीचा कधीच त्याग केला आहे. त्यामुळे या सर्वांनी मिळून महिला आरक्षण आणि मतदारसंघ पुनर्रचना विधेयकाला विरोध केला.

काँग्रेस सातत्याने नकारात्मक राजकारण केले. याच काँग्रेसने जनधन, आधार, डिजिटल पेमेंट यासह तिहेरी तलाक, कलम ३७० हटवण्याला विरोध केला. समान नागरी आचरसंहितेला काँग्रेसने त्याला विरोध केला. सुधारणांचं नाव ऐकताच काँग्रेस विरोधाच्या भूमिकेत जाते. देशाला बळकटी देण्याच्या प्रत्येक प्रयत्नात काँग्रेसने विरोध केला. त्यांनी 'एक देश एक निवडणूक'ला विरोध केला. त्याचसोबत सर्वच सुधारणांना काँग्रेसने खोटं बोलत विरोध केला.

# लोकशाहीचा विजय,सरकारचा कट उधळला:प्रियंका गांधी



भाजपला महिलांचे मसीहा बनायचे आहे, पण महिलांनी उन्नाव, हाथरस आणि मणिपूरमध्ये काय घडले ते पाहिले आहे. दिल्लीच्या रस्त्यावर बसलेल्या महिला खेळाडूंना कोणी विचारले? केवळ संसदेत उभे राहून मसीहा म्हणवून घेतल्याने फरक पडत नाही, तर तसे करून दाखवावे लागते, अशा शब्दात काँग्रेस सरचिटणी प्रियांका गांधी पीएम मोदींसह भाजपवर हल्ला चढवला. आम्हाला आश्चर्य वाटले की अचानक हे अधिवेशन का बोलावले गेले? कोणालाही मसुदा माहित नव्हता. हे एक प्रकारचे षडयंत्र होते की महिलांच्या नावावर आरक्षण आणून स्वतःची सत्ता कायमस्वरूपी कशी टिकवता येईल. हे विधेयक महिलांसाठी नव्हते, तर ते पुनर्रचनेसाठी होते, असा टीका त्यांनी केली.

# शिवरवाडीत सासऱ्याचा सुनेवर चाकूने खुनी हल्ला

**शिराळा/प्रतिनिधी:–**

शिराळा तालुक्यातील शिवरवाडी येथे एका धक्कादायक घटनेत सासऱ्याने आपल्या सुनेवर चाकूने सपासप वार करून तिला गंभीर जखमी केल्याची घटना घडली आहे. अनैतिक संबंध ठेवण्यास नकार दिल्याच्या रागातून हा प्रकार घडल्याचे फिर्यादीत म्हटले असून, याप्रकरणी शिराळा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, ऋतुजा प्रदीप बेंद्रे (वय २६, रा. शिवरवाडी) या शुक्रवारी (दि. १७ एप्रिल) सकाळी ११:३० वाजण्याच्या सुमारास गावातील 'तेकाची वाट' येथे कचरा टाकण्यासाठी गेल्या होत्या. यावेळी त्यांचे सासरे आरोपी शंकर श्रीपती बेंद्रे (रा. शिवरवाडी) तिथे आले. आरोपीने सुनेकडे अनैतिक संबंधाची मागणी केली होती, ज्याला ऋतुजा यांनी नकार दिला होता. याच गोष्टीचा मनात राग धरून, आरोपीने आपल्या पँटच्या खिशातून चाकू काढला आणि ऋतुजा यांच्या शरीरावर ठिकठिकाणी वार करून त्यांना जखमी केले.

जखमी ऋतुजा बेंद्रे यांच्यावर उपजिल्हा रुग्णालयात प्राथमिक उपचार करून ईश्वरपूर येथील खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. तक्रारीवरून आरोपी शंकर बेंद्रे याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.सदर गुन्ह्याचा तपास पोलीस उपनिरिक्षक उदय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस वैभव हवालदार पाटील करत आहेत. सूर्यकांत कुंभार यांनी या प्रकरणाची नोंद केली आहे.

# मोटारसायकलवरून चेन स्नॅचिंग

**सातारा/प्रतिनिधी:–**

रामनगर येथील हिना बंगल्याच्या समोर दि १६रोजी सायंकाळी ८ वाजण्याच्या सुमारास चैन स्नॅचिंगची घटना घडली आहे.यामध्ये फिर्यादी महिला वैशाली सुनील दळवी(वय ५५,रा.साई कॉलनी, अमरलक्ष्मी, संभाजीनगर, सातारा) या घरी जात असताना रामनगर येथील हिना बंगल्याच्या समोर ही घटना घडली. मोटारसायकलवरून आलेल्या दोन अनोळखी चोरट्यांनी महिलेच्या बाजूने पुढे जाऊन अचानक मोटारसायकल वळवून तिच्या समोर अडवले.

यानंतर आरोपींनी फिर्यादीजवळ येत तिच्या गळ्यातील सुमारे ७५ हजार रुपये किंमतीचे, अंदाजे १३ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मिनी मंगळसूत्र ओढून हिसकावून घेतले. घटनेनंतर दोन्ही आरोपी मोटारसायकलवरून भरधाव वेगाने देगाव रोडच्या दिशेने पसार झाले.या प्रकरणी शहर पोलिसांत गुन्हा नोंद करण्यात आला असून पोलिसांकडून आरोपींचा शोध सुरू आहे.अधिक तपास महिला पोलीस हवालदार सावंत करत आहे.

# होर्मुझमध्ये भारतीय तेल टँकरवर गोळीबार

## जहाज सामुद्रधुनी पार न करताच परतले

**तेहरान/वृत्तसंस्था:–**

इराणने हॉर्मुझच्या सामुद्रधुनीवर पुन्हा एकदा आपले लष्करी नियंत्रण कडक केल्याची घोषणा केल्यानंतर, शनिवारी ही सामुद्रधुनी ओलांडण्याचा प्रयत्न करणाऱ्या दोन व्यापारी जहाजांवर गोळीबार झाल्याची माहिती समोर आली आहे. तीन सागरी सुरक्षा आणि जहाज वाहतूक स्रोतांनी या वृत्ताला दुजोरा दिला आहे.

इराणचे सर्वोच्च नेते मुजतबा खमेनी यांनी त्यांच्या टेलिग्राम चॅनेलवर एक आव्हानात्मक संदेश पोस्ट करत म्हटले आहे की, इराणचे नौदल आपल्या शत्रूंचा 'पराभव करण्यासाठी सज्ज आहे.

सागरी ट्रॅकर्सनी दिलेल्या माहितीनुसार, सात आठवड्यांपूर्वी अमेरिका-इस्रायल आणि इराण यांच्यात युद्ध सुरू झाल्यापासून जहाजांची ही पहिलीच मोठी हालचाल होती. सुरुवातीला आठ टँकरचा ताफा या सामुद्रधुनीतून जाताना दिसला होता. मात्र, अमेरिकेने इराणच्या बंदराची नाकेबंदी सुरूच ठेवल्याने, इराणने जगातील एकूण तेल व्यापाराच्या पाचव्या भागासाठी महत्त्वाच्या असलेल्या या जलमार्गावर पुन्हा कडक लष्करी निर्बंध लादले आहेत.

भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने शनिवारी भारतात तैनात असलेल्या इराणी राजदूतांना बोलावून या घटनेबाबत औपचारिक निषेध नोंदवला.

यापूर्वी, इराणने होर्मुझची सामुद्रधुनी बंद करण्याचा आपला इरादा जाहीर केला होता. इराणने आरोप केला होता की अमेरिका शस्त्रसंधी कराराचे उल्लंघन करत आहे; तथापि, अमेरिकेने २४ तासांच्या आत आपला निर्णय मागे घेतला.



यावर इराणच्या बाजूने कोणतेही स्पष्टीकरण दिले गेले नाही, उलट गोळीबार सुरूच ठेवण्यात आला. यामुळे भारतीय टँकरला आपला मार्ग बदलावा लागला.

# नेस्को ग्राउंड ड्रग्स प्रकरणात फरार आरोपी पोलादपूरमध्ये अटक

## एक्सटसी पुरवठ्याचा धक्कादायक उलगडा

**प्रतापगड/प्रतिनिधी:–**

गोरेगाव येथील नेस्को ग्राउंडवर पार पडलेल्या म्युझिक कन्सर्टदरम्यान ड्रग्सच्या अती सेवनामुळे दोन युवकांचा मृत्यू झाल्याच्या गंभीर प्रकरणात पोलिसांनी महत्त्वाची कारवाई करत फरार आरोपीला अटक केली आहे. या घटनेमुळे मुंबईसह राज्यभरात खळबळ उडाली होती.

या प्रकरणी वनराई पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहिता तसेच एनडीपीएस कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपासादरम्यान या गुन्ह्यातील मुख्य संशयित आरोपी आयुष विकी साहित्य (वय २४, रा. उल्हासनगर) हा घटनेनंतर फरार झाला होता. तो मुंबई-गोवा महामार्ग मार्गे गोव्याकडे पळून जात असल्याची गोपनीय माहिती मुंबई पोलिसांना मिळाली होती.

या माहितीच्या आधारे पोलादपूर पोलिस ठाणे आणि स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने तात्काळ हालचाल करत पोलादपूर परिसरात नाकाबंदी व सापळा रचला. काही वेळातच संशयित वाहनाची ओळख पटवून आरोपीला शिताफीने ताब्यात घेण्यात आले.

तपासात उघड झाले की,



आयुष साहित्य याने सदर म्युझिक कन्सर्टमध्ये एक्सटसी या नावाचे अमली पदार्थ वितरित केले होते. या अमली पदार्थांच्या सेवनामुळेच दोन युवकांचा मृत्यू झाल्याचा प्राथमिक निष्कर्ष समोर आला आहे. पोलिसांकडून या प्रकरणाचा अधिक सखोल तपास सुरू असून, या रॅकेटमध्ये आणखी कोणाचा सहभाग आहे का याचाही शोध घेतला जात आहे.

### अक्षय्य सण..

मुहूर्त शुभ साडेतीन
सण तृतीया अक्षय्य
धर्मा जोड शास्त्राची
विविधगुण समुच्चय
श्री बसवेश्वर अवतरे
वातावरण भक्तीमय
परशुराम जन्मोत्सव
पराक्रमे स्तब्ध समय
ऋषभदेवे प्राशन रस
जैनधर्मीतप सुखमय
श्री विग्रह चरणदर्शने
उचंबळून आले हृदय
बद्रिनाथद्वार खोलता
भावरूपा मन तन्मय
पितरांचे ऋण आठवे
दानधर्म करा चिन्मय
अधिकतीव्र उन्हाळा
गोंगावती तप्त मलय
जपे सकलप्राणीमात्र
नकोआरोग्यां हयगय
कृषीकार्ये आरंभ हो
एकमेका करे सावय
निसर्गास काय हवय
बदलली जाय सवय
चैत्रगौरी पूजन संपन्न
उत्सवार्थ सजेआलय
धर्म अर्थ शास्त्र पुण्य
साधा सुरेख समन्वय

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

# कापरी येथे ग्रामपंचायत सदस्याची आत्महत्या

**शिराळा/प्रतिनिधी:–**



कापरी (ता. शिराळा) येथील ग्रामपंचायत सदस्य विशाल तानाजी पाटील (वय ३२) यांनी राहत्या घरी आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. सदर घटना शनिवार दि.१८ रोजी दुपारी साडे चारच्या दरम्यान घडली.

याबाबत माहिती अशी की, विशाल पाटील यांनी राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली.आत्महत्येचे कारण समजू शकले नाही. याबाबत संतोष पाटील यांनी शिराळा पोलीस ठाण्यात वर्दी दिली असून पुढील तपास हवालदार इरफान मुल्ला हे करीत आहेत.मयत विशाल यांच्या पश्चात आई, वडील, भाऊ, भावजय असा परिवार आहे.

# वैकुंठधाम स्मशानभूमीत मध्यरात्री हाणामारी

## तरुणावर दांडक्याने जीवघेणा हल्ला;चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल

**विटा/प्रतिनिधी:–**

विटा शहरात मध्यरात्रीच्या सुमारास स्मशानभूमीत घडलेल्या हाणामारीच्या घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे. किरकोळ कारणावरून काही तरुणांनी एका युवकावर लाकडी दांडक्याने व इतर हत्यारांनी हल्ला करून त्याला गंभीर जखमी केल्याची घटना उघडकीस आली आहे. ही घटना पारे रोडलगत असलेल्या वैकुंठधाम स्मशानभूमीत रात्री सुमारे १२.३० वाजण्याच्या सुमारास घडली.

याबाबत पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, कराड रोड, लक्ष्मीनगर येथील अभिजीत सिद्धार्थ झेंडे (वय २०) हा तरुण वैकुंठधाम स्मशानभूमीत असताना काही जणांनी त्याच्याशी वाद घातला. आमच्याकडे रागाने का बघतोस? तू विट्याचा डॉन आहेस का? असे म्हणत त्याला धमकावत मारहाण करण्यात आली. यावेळी संबंधितांनी आमच्या नादाला लागू नको, आम्हाला पाहिलं की नजर खाली घालायची, अशा शब्दांत धमकी देत झेंडेंवर लाकडी दांडक्याने, तसेच अन्य हत्यारांनी हल्ला चढवला. या हल्ल्यात झेंडे गंभीर जखमी झाले असून, त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

या प्रकरणी जखमी अभिजीत झेंडे यांनी विटा पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यानुसार रितेश विलास खरात, आदित्य कैलास भिंगारदेवे, पृथ्वीराज विलास भिसे आणि इशांत (पूर्ण नाव अज्ञात) यांच्याविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे. घटना



विटा पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडल्याने पोलिसांनी तातडीने गुन्हा दाखल करून आरोपींचा शोध सुरू केला आहे. या घटनेमुळे शहरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, नागरिकांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे.

# 'शाळा क्रमांक ३'चे उपक्रम राज्यभर राबवणार

## पालकमंत्री शंभूराज देसाई;१०.५५ कोटींच्या 'स्टार्स' प्रकल्पांतर्गत भूमिपूजन

**कराड/प्रतिनिधी:–**

कराड नगरपालिकेच्या 'शाळा क्रमांक ३'ने राबवलेले उपक्रम राज्यातील इतर शाळांसाठी मार्गदर्शक ठरत आहेत. त्यामुळे लवकरच जिल्ह्यातील पालिका शाळांसाठी कार्यशाळा आयोजित करून हे उपक्रम सर्वत्र राबवले जातील, अशी ग्वाही पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी केली.

येथील पालिकेच्या शाळा क्रमांक ३ या राज्यातील आदर्श शाळेच्या तिसऱ्या केंद्र शासनाच्या 'स्टार्स' (ढढ-ठड) प्रकल्पांतर्गत मंजूर झालेल्या १० कोटी ५५ लाख रुपयांच्या या इमारतीचा शुभारंभ पालकमंत्री शंभूराज देसाई यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी सहकारमंत्री बाळासाहेब पाटील होते. यावेळी जिल्हाप्रमुख जयवंतराव शेलार, नगराध्यक्ष राजेंद्रसिंह यादव, उपनगराध्यक्ष प्रतापराव साळुंखे, मुख्याधिकारी प्रशांत व्हटकर, तसेच नगरसेवक व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


पालकमंत्री देसाई म्हणाले, राज्यातील आदर्श शाळा म्हणून कराडची ओळख निर्माण झाली आहे. या शाळेत प्रवेशासाठी पालकांची रांग लागते, ही अभिमानास्पद बाब आहे. पालकमंत्री पदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर स्मार्ट प्राथमिक आरोग्य केंद्र आणि मॉडेल स्कूल या दोन योजनांवर विशेष भर देण्यात आला असून, मराठी शाळांमध्ये सकारात्मक बदल टप्प्याटप्प्याने घडवले जात आहेत. तसेच, आठवी ते दहावीपर्यंत वर्गवाढीचा प्रस्ताव आल्यास त्यावर सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासनही त्यांनी दिले.

अध्यक्षस्थानावरून बोलताना बाळासाहेब पाटील यांनी, प्राथमिक शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. राज्यातील बहुसंख्य नागरिकांचे शिक्षण हे प्राथमिक व नगरपालिका शाळांत झाले आहे. त्यामुळे सर्वसामान्यांना दर्जेदार शिक्षण देण्यात या शाळांची भूमिका महत्त्वाची असल्याचे त्यांनी सांगितले. कराड हे विद्येचे माहेरघर असून, यशवंतराव चव्हाण यांच्या कार्यामुळे येथे अनेक शैक्षणिक संस्था उभ्या राहिल्या, याची त्यांनी आठवण करून दिली.

नगराध्यक्ष राजेंद्रसिंह यादव यांनी, कराड नगरपालिकेच्या शैक्षणिक प्रगतीचा आढावा घेताना सांगितले की, 'शाळा क्रमांक ३'ने विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून महाराष्ट्रात कराडचा लौकिक वाढवला आहे. नव्या इमारतीत ३७ सुसज्ज वर्गखोल्या, मीटिंग हॉल, तसेच प्रशस्त सभागृह उभारण्यात येणार असून, विद्यार्थ्यांना आधुनिक सुविधा उपलब्ध होणार असल्याचे त्यांनी नमूद केले.



# महिला विधेयकाचे राजकारण




**मोदी सरकारने संसदेत नारी शक्ती वंदन कायदा आणताना त्याच्या आडून तीन विधेयक आणली जात होती. याला संसदेत कडवा विरोध झाला आणि हे विधेयक पास होवू शकले नाही. पहिल्यांदाच मोदी सरकारला विधानसभेत नामुष्की घ्यावी लागली. विरोधकांनी महिला आरक्षण लागू करा पण जे यापूर्वी मंजूर केले आहेत ते असे ठाम मत मांडले. महिला आरक्षणाच्या आडून सुरू असलेला भाजपाचा अजेंडा कॉंग्रेससह इतर पक्षांनी मोडीत काढत त्यांच्यावर नामूष्किची वेळ आणली आता महिला आरक्षणाचे राजकारण संसधेच्याबाहेर सुरू होईल अथवा सुरू झाले आहे. महिलांसाठी आम्ही लढत राहू आणि हा कायदा अमलात आणू असा चंगच भाजपच्या नेत्यांनी होवू घातलेल्या दोन राज्यांच्या विधानसभा निवडणूका आणि आगामी लोकसभा निवडणूकीचा अजेंडा बणवन्याचा कुटीड डाव हे मांडण्याचा प्रयत्न करतील मात्र विरोधक हा डाव खोडून काढण्याचा प्रयत्न करणार हे मात्र निश्चित. कालच्या विधेयकामध्ये मोदी सरकारचा पराभव झाल्याने भाजपाची वाट बिकट आहे. हे सिद्ध झाले आहे.**

संसदेत आवश्यक बहुमत नसेल, तर सरकारने विरोधकांना विश्वासात घेऊन विधेयके मांडणे गरजेचे असते. विशेषत: घटनादुरुस्ती विधेयकाबाबत सरकारने विरोधकांना विश्वासात घेणे आवश्यक ठरते. लोकसभा आणि राज्यांच्या विधानसभांमध्ये महिलांना ३३ टक्के आरक्षण देण्यासाठी 'नारीशक्ती वंदन अभियान' विधेयक सरकारने गुरुवारी (१६ एप्रिल २०२६) लोकसभेत मांडले. याशिवाय महिला आरक्षणाशी संबंधित तीन महत्त्वपूर्ण सुधारणा विधेयके सादर करण्यात आली.

विरोधकांना विश्वासात घेऊन विधेयके मांडली असती, तर सरकारचा विरोधकांशी संघर्ष झाला नसता. सरकार आपल्याच कलाने पुढे जात असल्याने विरोधक आक्रमक झाले आहेत. या विधेयकांत महिला आरक्षण कायद्याची अंमलबजावणी आणि वादग्रस्त सीमांकन प्रक्रियेबाबतच्या तरतुदींचा समावेश असल्याने संसदेत सरकार आणि विरोधक यांच्यात जोरदार संघर्ष होण्याची चिन्हे आहेत. १३१ वे घटनादुरुस्ती विधेयक पुढे रेटण्याचा सरकार प्रयत्न करत असल्याचे लक्षात घेऊन विरोधक संघटित झाले. लोकसभा आणि विधानसभा मतदारसंघांची संख्या वाढवून महिलांना आरक्षण देण्याचा सरकारचा प्रयत्न आहे.

आरक्षणाचा संबंध सरकारने सीमांकनाशी जोडल्याने विरोधकांनी विधेयकांना विरोध करण्याचे ठरविले आहे. देशातील दक्षिण विभागातील राज्यांनी लोकसंख्येवर निमंत्रण ठेवले. त्यामुळे या राज्यांची लोकसंख्या कमी आहे. लोकसंख्येच्या प्रमाणात मतदारसंघ निश्चित करण्यात येणार असल्याने लोकसभेत दाक्षिणात्य राज्यांचे प्रतिनिधित्व कमी होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. दुसरीकडे, भाजपाचा प्रभाव असलेल्या उत्तर विभागातील राज्यांची लोकसंख्या जास्त असल्याने तिकडील लोकसभा मतदारसंघांची संख्या वाढणार आहे. एकूणच दक्षिणेवर अन्याय होणार असल्याने विरोधक सावध झाले आहेत. दक्षिण भागातील राज्यांमध्ये अशी चिंता व्यक्त केली जात आहे. विरोधकांमध्ये विशेषत: इंडिया आघाडीतील पक्ष परस्परविरोधी असले, तरी त्यांचा भाजपाला विरोध आहे. कॉंग्रेसने सर्व विरोधकांना एकत्र करण्याचा प्रयत्न केला.

कॉंग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी

**प्रीतिसंगमावरून**

बोलाविलेल्या बैठकीला दोन्ही कम्युनिस्ट पक्ष, तृणमूल कॉंग्रेस, शिवसेना ठाकरे गट, द्रमुक, आम आदमी पार्टी इत्यादी पक्षांचे प्रतिनिधी उपस्थित होते. पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांची प्रक्रिया सुरू असताना सरकारने १६ एप्रिलपासून तीन दिवसांचे विशेष संसद अधिवेशन बोलाविले. तसे म्हटले तर अर्थसंकल्पीय अधिवेशन सरकारने लांबविले आहे. घटनादुरुस्ती विधेयक मंजूर होण्यासाठी लोकसभा व राज्यसभा अशा दोन्ही सभागृहांत सरकारकडे दोन तृतीयांश बहुमत नाही. महिला आरक्षण विधेयक नामंजूर झाले, तर ते विरोधकांमुळे, अशी टीका भाजपाकडून निवडणूक प्रचारात केली जाऊ शकते. केवळ राजकीय लाभ घेण्यासाठी घाईघाईने अधिवेशन बोलाविण्यात आल्याचा विरोधकांचा आक्षेप आहे. तसे म्हटले तर जनगणना सुरू असताना सरकारला विधेयक मांडण्याची घाई का झाली? हा प्रश्न आहे.

सध्या सुरू असलेल्या जनगणनेची आकडेवारी समोर आल्यानंतर लोकसभा आणि विधानसभांच्या जागा वाढविणे सोयीस्कर आणि संयुक्तिक ठरले असते. सन २०११ च्या जनगणनेनुसार लोकसभा आणि विधानसभांच्या जागा वाढवून महिलांना आरक्षण देण्यात येणार आहे. सध्याच्या जागांनुसार आरक्षण देण्यास सरकारची तयारी नसल्याचे दिसत आहे. लोकसभेच्या सध्या ५४३ जागा आहेत. या जागांच्या ३३ टक्के म्हणजे १८०/१८१ जागा वाढविण्याची गरज आहे. विविध राज्यांच्या विधानसभांमध्ये ३३ टक्के जागा देताना सध्याच्या जागांचा विचार करायला पाहिजे. पण सरकार तसा काहीच विचार करत नाही. महिला आरक्षण विधेयक २०२३ मध्येच मंजूर झाले. जनगणना आणि लोकसभा मतदारसंघांची फेररचना केल्यानंतरच त्याची अंमलबजावणी केली जाईल, असे त्यावेळी सरकारने स्पष्ट केले होते.

सरकारची पहिली जबाबदारी जनगणना पूर्ण करणे, ही आहे. जनगणनेला पाच वर्षांहून अधिक उशीर झाला आहे. स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच जनगणनेला इतका उशीर झाला. वास्तविक २०२१ मध्ये जनगणना पूर्ण होणे अपेक्षित होते. पण सरकारने त्यावेळी कोरोनाचे कारण देत जनगणना लांबवत नेली. त्यानंतर जातनिहाय जनगणनेचे आमिष दाखवले गेले. जनगणना पूर्ण झाल्यानंतर मतदारसंघांची फेररचना अपेक्षित होती आणि त्यानंतर प्रत्यक्ष महिला आरक्षणाची अंमलबजावणी अपेक्षित होती. पण सरकारने २०११ च्या जनगणनेच्या आधारावर मतदारसंघांची पुनर्रचना करण्याचे ठरविले आहे. विरोधकांचा यालाच आक्षेप आहे. सरकारने याबाबतीत विरोधकांना विश्वासात घेतले पाहिजे होते. पण विरोधक विरोध करत असल्याचा शंख सरकार फुंकत आहे.

सन २०२९ च्या लोकसभा निवडणुकीत महिला आरक्षणाची अंमलबजावणी करण्याचा सरकारचा विचार आहे. आधीच्या मूळ विधेयकानुसार २०३४ पासून महिला आरक्षण लागू होणे अपेक्षित होते. पण सरकारने हा विषय अचानक हातात घेतला आहे. सरकारचा प्रत्येक निर्णय म्हणजे केवळ काहीतरी राजकीय डाव असतो, हे अनेक वेळा सिद्ध झाले आहे. काही ना काहीतरी राजकीय डाव साधायचा, हाच सरकारचा प्रयत्न असतो. सध्याच्या घडीला तामिळनाडू आणि पश्चिम बंगालमध्ये निवडणुकीची प्रक्रिया सुरू असताना ती प्रक्रिया पूर्ण व्हायच्या आधीच घाईगडबडीने संसदेचे हे तीन दिवसांचे विशेष अधिवेशन बोलावण्याचे काहीच कारण नव्हते.

तीन राज्यांतील मतदानाची प्रक्रिया याआधी पूर्ण झाली आहे आणि आता प. बंगाल आणि तामिळनाडूतील मतदान प्रक्रिया २९ एप्रिल रोजी पूर्ण होणार आहे. त्यानंतर कधीही हे विशेष अधिवेशन बोलावणे शक्य होते. राजकीय कुरघोडीच्या हेतूने हा घोळ घालायचा प्रयत्न सरकारने चालवला असल्याचे दिसते. महिलांना आम्ही लोकसभेत आरक्षण दिले, याचा लाभ त्यांना तामिळनाडू आणि पश्चिम बंगालमधील निवडणुकांमध्ये उठवायचा, हाच सरकारचा हेतू असल्याचा विरोधकांचा आरोप आहे. जनगणना केल्यानंतर मतदारसंघांची फेररचना करण्याचे जर ठरले असताना जनगणना पूर्ण होण्याआधीच सरकार आपल्या कलाने जागा वाढवून महिलांना आरक्षण देऊ पाहत आहे.

घटनादुरुस्ती विधेयक मंजूर झाले नाही, तर त्याचे खापर विरोधकांवर फोडण्यासाठी सरकार सज्ज राहील. पण सरकारने विरोधकांना विश्वासात घ्यायला पाहिजे



## अक्कलकोट नगरपरिषदेच्या सभेत अनेक महत्त्वपूर्ण निर्णयांवर शिक्कामोर्तब

### नगराध्यक्ष मिलनदादा कल्याणशेट्टी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली सर्वसाधारण सभा

**अक्कलकोट/प्रतिनिधी:-**

अक्कलकोट नगरपरिषदेची सर्वसाधारण सभा पंडित दीनदयाळ उपाध्याय सभागृह येथे उत्साहात अक्कलकोट येथे संपन्न झाली. या सर्व साधारण सभेमध्ये अनेक महत्त्वपूर्ण निर्णयांवर शिक्कामोर्तब करण्यात आले.पंडित दीनदयाळ उपाध्याय सभागृह, अक्कलकोट येथे नगरपरिषदेची सर्वसाधारण सभा माझ्या अध्यक्षतेखाली उत्साहात पार पडली. या सभेत शहराच्या विकासाशी निगडित विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली आणि जनहिताचे महत्त्वाचे ठराव मंजूर करण्यात आले.

सभेतील काही प्रमुख निर्णय:

सभेच्या सुरुवातीला मागील सभांचे इतिवृत्त कायम करण्यात आले आणि शहराच्या प्रलंबित विकासकामांना रीतसर मंजुरी देण्यात आली. दक्षिण महाद्वार समोरील दक्षिण बाजूस देवस्थानच्या नियोजित स्वागत कमान प्रवेशद्वारास तसेच मुरलीधर मंदिर समोरील दर्शन मंडप स्वागत कमान प्रवेशद्वारास 'कै.कल्याणराव (बाळासाहेब) इंगळे प्रवेशद्वार' असे नामकरण करण्यास मान्यता देण्यात आली. खासबाग येथील चौकाचे 'धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज चौक' असे नामकरण करण्याचा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला. अक्कलकोट शहराचे धार्मिक महत्त्व जपण्यासाठी शहरातील मांसविक्री प्रत्येक गुरुवारी बंद ठेवण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. याव्यतिरिक्त शहराच्या पायाभूत सुविधा आणि सर्वांगीण विकासाच्या विविध कामांनाही गती देण्याचे निश्चित करण्यात आले आहे.

या सभेस मुख्याधिकारी रमाकांत डाके, उपनगराध्यक्ष ऋतुराज राठोड, पक्षनेते यशवंत घोंगडे, बांधकाम सभापती सद्दाम शेरीकर, पाणीपुरवठा सभापती देविदास कवटगी, स्वच्छता व आरोग्य सभापती अविनाश मडिखांबे, महिला व बालकल्याण सभापती सौ. सोनाली शिंदे, शिक्षण सभापती कु. अपर्णा सिद्धे, नगरसेवक महेश इगळे, महेश हिडोळे, लक्ष्मीकांत धनशेट्टी, रमेश कापसे, भिमराव शेळके, प्रवीण शहा, अशोक जाधव, नावेद डांगे, संजय घोडके, श्रीमती कस्तुरा चोगुले, सौ.अमृता शिंदे, सौ.रेणुका राठोड, सौ.शैला स्वामी, सौ.मंजना कामनूरकर, सौ. भागुबाई कुंभार, सौ.स्नेहा खवळे, सौ.अल्फिया कोरबु, सौ. सुनंदा स्वामी, कॉंग्रेस नगरसेवक मुस्तफा बळोरगी, नगरसेविका जहिराबी शेख, शिवसेना नगरसेविका सरिता कुर्ले तसेच नगरपरिषदेमधील सर्व विभागीय अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

अक्कलकोट शहराला एक आदर्श आणि विकसित शहर बनवण्यासाठी आम्ही सर्वजण एकत्रितपणे प्रयत्नशील आहोत. असे नगराध्यक्ष मिलनदादा कल्याणशेट्टी यांनी सांगितले

## आमचा राज आणि साज फक्त डॉ बाबासाहेबामुळेच

### प्रा रेखा सोनकवडे

**अक्कलकोट/प्रतिनिधी:-**

आज आमचा राज आणि साज आहे तो फक्त आणि फक्त फक्त डॉ बाबासाहेबामुळेच आहे असे गौरव उद्गार प्रा रेखा सोनकवडे यांनी काढले.

जि.प.प्राथमिक मराठी शाळा खैराट या शाळेत डॉ .बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती साजरी करण्यात आली. या प्रसंगी झालेल्या शानदार कार्यक्रमात प्रा रेखा सोनकवडे बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बाळूसिंग राजपुत हे होते. तर महामानव क्रांतिसूर्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन सुनील होनाजे यांनी केले.

दिव्या मायाचारी गायत्री गायकवाड अनम पटेल बिबनबी बिराजदार सुप्रिया तोळनुरे अंकिता घुगरे प्राची पांचाळ इत्यादी विद्यार्थ्यांनी डॉ .आंबेडकरबद्दल भाषणं केली. त्यानंतर त्यांच्याविषयीची गाणी म्हणण्यात आली. अतिशय प्रसन्न वातावरणात जयंती उत्सव साजरा करण्यात आला. आपल्या गाण्यांतून न्रुत्यातून विद्यार्थ्या मोठ्या आनंदाने सहभागी झाले .आज डॉ .बाबासाहेब नसते तर दिनदलितांना समाज जगू दिला नसता .अस्पृश्य म्हणून हीन वागणूक आजही मिळाली असती .लाचारी जीवन जगून माणूस आला तसा गेला असता .हे ऐकायला आणि विचार करायला सुध्दा



नको वाटणाऱ्या गोष्टी आहेत .देशाचा विचार करून अस्पृश्यता दूर करण्यासाठी अहोरात्र झटून संघर्ष करून न्याय मिळवून माणसाला माणूस म्हणून जगण्याचा हक्क निर्माण करून दिला. आज आमचा जगण्याचा साज आणि ताठमानेने वावरतो तो राज फक्त आणि फक्त डॉ .भीमराव आंबेडकरामुळेच .प्रत्येक माणसाला देव वाटावा असे कार्य त्यांनी देशासाठी केलं आणि .३२ पदव्या घेऊन देशासाठी संविधान लिहुन देशाला किंबहुना प्रत्येक व्यक्तीला न्याय मिळवून दिला .हिंदू कोड बिल मधे अनेक कायदे केले ज्या कायद्यांनी देश आणि देशातील नागरिक त्याच कायद्याने चालतात .डॉ .बाबासाहेब आंबेडकर यांनी जनतेला न्याय समता बंधुता दिली .त्यांनी केलेले कार्य गगनाला भिडले आहे त्यांच्या महान कार्याला व बाबासाहेब आंबेडकर यांनी त्रिवार कोटी कोटी अभिवादन असे बोलताना सौ .रेखा लक्ष्मण सोनकवडे यांनी सांगितले.

सुनील होनाजे यांनी डॉ .बाबासाहेब आंबेडकर यांच्या बद्दल विद्यार्थ्याला माहिती सांगितली. आशा वर्कर्स उषा पांचाळ यांनी पण डॉ.बाबासाहेबाबद्दल माहिती सांगून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. जमादार काका जयंती कार्यक्रमाला उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या .बाळूसिंग राजपुत दिनदलितांचे कैवारी व उद्धारकर्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी देशासाठी अमूल्य कार्य केले आहेत असे माहिती देताना सांगितले. फिरोजा नदाफ यांनी मार्गदर्शन करून आभार मानले.

## अक्षयतेचा सुवर्णयोग : परंपरा, पराक्रम आणि परमार्थाचा दिवस




वैशाख शुद्ध तृतीया, म्हणजेच अक्षय तृतीया. हिंदू संस्कृतीत अत्यंत शुभ, पवित्र आणि चिरंतन फलदायी मानला जाणारा दिवस. 'अक्षय' म्हणजे कधीही न संपणारे. या दिवशी केलेले दान, जप, तप आणि सदाचार हे अखंड पुण्य देणारे मानले जातात. यंदा हा दिवस अधिकच वैशिष्ट्यपूर्ण ठरतो आहे. कारण याच दिवशी भगवान परशुराम यांची जयंती, समतेचे महान विचारवंत महात्मा बसवेश्वर यांची जयंती, तसेच हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची तिथीनुसार जयंतीही (एकत्र) साजरी होत आहे. भगवान परशुराम हे अन्यायाविरुद्ध उभे राहणाऱ्या शक्तीचे प्रतीक मानले जातात. महात्मा बसवेश्वर यांनी समता, श्रमप्रतिष्ठा आणि सामाजिक न्यायाचा दीप प्रज्वलित केला. तर छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य, शौर्य आणि लोककल्याण यांचे अद्वितीय आदर्श निर्माण केले. अक्षय तृतीया हा केवळ धार्मिक सण नाही, तर तो नवीन सुरुवातीचा, सद्गुणांचा आणि सकारात्मकतेचा संदेश देणारा दिवस आहे. या दिवशी सुवर्णखरेदी, दानधर्म, नवीन उपक्रमांची सुरुवात यांना विशेष महत्त्व आहे. पण त्याहीपलीकडे जाऊन, या दिवसाचा खरा अर्थ आहे- सद्विचार आणि सत्कर्म यांची अखंड परंपरा जपणे. आजच्या धावपळीच्या जीवनात या चारही महान प्रेरणांचा संगम आपल्याला एकच संदेश देतो; धर्म, समता, पराक्रम आणि सदाचार यांच्या मार्गाने चालल्यासच जीवन खऱ्या अर्थाने 'अक्षय' होते.

**वाचकाचे पत्र**

**- प्रा. व्ही.व्ही.कोष्टी, शिपूर (जि. सांगली)**

## सोशल मीडियाचा वापर फक्त ट्रेंडिंगसाठी न करता गरजूंच्या मदतीसाठी करा

### वरिष्ठ पोलीस निरीक्षक दीपक भिताडे साहेब यांचे आवाहन

**अक्कलकोट/महेश गायकवाड:-**

सोशल मीडिया चा वापर फक्त ट्रेडिंग साठी न करता गरजूंच्या मदतीसाठी करा असे आवाहन येथील उत्तर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दीपक भिताडे साहेब यांनी केले. सोशल मीडियावर हरवलेल्या व्यक्तीचा शोध लागल्या नंतर सामाजिक कार्यकर्ते सोहेल फरास आणि त्यांच्या टीम ने रीतसर हरवलेल्या व्यक्तीला त्यांच्या नातेवाईकांकडे पोलीस निरीक्षक दीपक भिताडे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली सुपूर्द करण्यात आले या प्रसंगी वरिष्ठ पोलीस निरीक्षक दीपक भिताडे साहेब बोलत होते.

अक्कलकोट येथे चुकून आलेल्या छत्रपती संभाजी नगर मधील वृद्धांस सोशल मीडिया ने त्यांच्या नातेवाईकांकडे मिळवून दिले याबद्दल त्यांच्या नातेवाईकांनी आभार व्यक्त केले.

छत्रपती संभाजी नगर येथील चुकून अक्कलकोट येथे आलेल्या सोशल अक्कलकोट मधील सोशल मीडिया ने त्यांच्या नातेवाईकांची गाठ भेट घालून दिली. यासाठी येथील मानवता फाउंडेशन चे प्रमुख आणि सोशल मीडियावर सक्रीय असलेले सामाजिक कार्यकर्ते सोहेल फरास आणि त्यांच्या टीम ने परिश्रम घेतले. सोशल मीडियाच्या मदतीने हरविलेले मिसिंग झालेले सांवगी ता. संभाजीनगर जिल्हा संभाजीनगर येथील प्रकाश वामनराव देशमुख यांचा शोध घेऊन मुलगी पुनम किशोर चांदूरकर यांच्या कडे सुखरूप सुपुर्द करण्यात आले.

अक्कलकोट:काल दिनांक १६ एप्रिल रोजी दुपारी ४:०० वाजण्याच्या सुमारास अक्कलकोट येथील अन्नछत्र मंडळ पार्किंग येथून मिसिंग झालेले प्रकाश वामनराव देशमुख हे आज दिनांक १७ एप्रिल रोजी दुपारी २:१५ वाजता अक्कलकोट शहरातील होटकर गल्ली महादेव मंदिर येथे मिळून आले.

नातेवाईक येईपर्यंत अक्कलकोट उत्तर पोलीस ठाणे येथे बसवण्यात आले होते. तब्बल दोन तासानंतर प्रकाश वामनराव देशमुख यांची मुलगी पुनम किशोर चांदूरकर व गाडी ड्रायव्हर सागर सूर्यवंशी पोलीस स्टेशन येथे आल्यावर प्रकाश वामनराव देशमुख यांना मुलगी पुनम किशोर चांदूरकर यांच्या कडे सुखरूप सुपुर्द करण्यात आले.

मिसिंग झालेल्या प्रकाश वामनराव देशमुख यांची मुलगी पुनम किशोर चांदूरकर व गाडी ड्रायव्हर



सागर सूर्यवंशी यांनी मिसिंग झालेले प्रकाश वामनराव देशमुख हे सुखरूप व परत मिळाल्याबद्दल व त्यांना शोधण्यासाठी सहकार्य केल्याबद्दल आभार मानले.

या शोध मोहिमेत सदर व्यक्ती होटकर गल्ली येथे असल्याचे फोन करून आयान हगलदिवटे यांनी सांगितल्याबद्दल त्यांचे ही मनापासून आभार व्यक्त करण्यात आले. .

या वेळी सोहेल फरास, ज्योतिबा पारखे, सैपन शेख, महेश कोळी साहेब, धोंडीबा ठेंगले साहेब, पोलीस निरीक्षक दीपक भिताडे साहेब.यांच्यासह मानवता फाउंडेशन चे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते. माणुसकी हाच खरा धर्म आहे मेल्यावर खांदा देण्यापेक्षा जिवंतपणे मदतीचा हात द्या असे आवाहन याप्रसंगी सर्वांनी केले.

> सोशल मीडियाचा वापर फक्त ट्रेंडिंगसाठी नव्हे, तर गरजू, हरवलेले, आणि मदतीची गरज असणाऱ्यांसाठी करा. आवाहन याप्रसंगी वरिष्ठ पोलीस निरीक्षक दीपक भिताडे साहेब यांनी केले. मेल्यावर खांदा देण्यापेक्षा जिवंतपणी मदतीचा हात द्या.आणि समाजात सामाजिक बांधिलकी बाळगा असेही पो नि दीपक भिताडे साहेब यांनी आवाहन केले.

## अक्षय तृतीया

हा साडेतीन मुहूर्तांपैकी एक शुभमुहूर्त मानला जातो. तसेच भगवान विष्णूचा सहावा अवतार परशुरामांचा जन्म या दिवशी झाला म्हणून याला 'परशुराम जयंती' ही म्हणतात. अक्षय तृतीयेला अध्यात्मिक महत्त्व आहे.या दिवशी जप, होम, पितृतर्पण, दान जे आपण करू ते अक्षय होते. मुख्य म्हणजे हा पितृ पूजेचा दिवस मानला जातो .

**वाचकाचे पत्र**

या दिवशी तीळतर्पण करावे. असे शास्त्र आहे. या दिवशी उदक कुंभही दान देतात. गंध, तीळ, अन्नधान्य आणि फळे या सह हा उदक कुंभ पितरां प्रित्यर्थ दान दिला जातो. तो त्यांच्या अक्षय उपयोगी पडो. अशी प्रार्थना ही केली जाते. या तिथीस पवित्र जलात स्नान, दान यासारखी धर्म कृत्ये केल्यास. त्याचा अध्यात्मिक लाभ ही होतो. या तिथीस केलेले दान आणि हवन क्षयाला जात नाही. म्हणून ऋषी मुनींनी हिला 'अक्षय तृतीया' म्हटले आहे. देव आणि पितर यांना उद्देशून या तिथीस जे कर्म केले जाते. ते अविनाशी म्हणजे अक्षय होते .या दिवशी उन्हापासून संरक्षण करणारी छत्री, जोडे, इत्यादी ही दान दिले जाते. 'दान' म्हणजे योग्य मार्गाने मिळवलेले धन किंवा वस्तू योग्य व्यक्तीला देणे. सन्मार्गाने मिळवलेल्या धनाचे राष्ट्र किंवा धर्म यासाठी कार्यरत संस्था किंवा संघटना यांना दिलेले दान मोक्षास कारणीभूत ठरू शकते.स्त्रियांना हा दिवस खूप महत्त्वाचा असतो. त्यांना चैत्रात बसवलेल्या चैत्र गौरीचे त्या दिवशी विसर्जन करायचे असते. त्या दिवशी त्या हळदीकुंकू ही करतात.

**श्रीमती वासंतीला लावंघरे. सातारा**

## आंब्यांपासून खोडकरपणापर्यंत: सोनी सब कलाकारांनी त्यांच्या गोड उन्हाळी आठवणींना उजाळा दिला

उन्हाळा हा फक्त ऋतू नसून, तो एक भावना आहे - स्वातंत्र्याची, जुन्या आठवणींची आणि छोट्या-छोट्या आनंदांची, जी कायम मनात राहतात. लांब मोकळे दिवस, कौटुंबिक सुट्ट्या, आंब्यांनी भरलेली दुपार, आईस्क्रीम्स आणि उन्हातल्या बालपणीच्या खोडकर आठवणी - उन्हाळा प्रत्येकाच्या मनात खास जागा घेतो. या दिवसांत दिनचर्या थोडी संथ होते, हशा सहज उमटतो आणि छोट्या क्षणांत मोठ्या आठवणी तयार होतात. यंदा सोनी सब चे कलाकार गुलकी जोशी, मुस्कान बामने आणि अक्षया हिंदळकर यांनी त्यांच्या उन्हाळ्याच्या आठवणींना उजाळा दिला आहे बालपणीच्या गोड क्षणांपासून ते आजही आनंद देणाऱ्या परंपरांपर्यंत.

इक्बाल खान, यादें मधील डॉ. देवची भूमिका साकारणारे, सांगतात, जेव्हा जेव्हा मी उन्हाळ्याचा विचार करतो, तेव्हा माझं मन थेट काश्मीरमधल्या दिवसांकडे जातं. खरं सांगायचं तर, तिथे उन्हाळा कधीच उन्हाळ्यासारखा वाटला नाही कारण हवामान नेहमीच सुखद असायचं. आम्ही मोठ्या कॉलनीत राहत होतो आणि त्या दिवसांत सकाळपासून संध्याकाळपर्यंत बाहेरच वेळ जायचा. दिवसभर खेळणं, धावपळ करणं, सफरचंद तोडणं आणि बाहेरच्या प्रत्येक क्षणाचा आनंद घेणं हेच आमचं आयुष्य होतं.

गुलकी जोशी, यादें मधील सृष्टीची भूमिका साकारणारी, सांगते, माझ्यासाठी उन्हाळा नेहमीच खूप नॉस्टॅल्जिक वाटतो.



शांत दुपारी, पुस्तक वाचणं आणि थोडं संथ होणं - हे सगळं उन्हाळ्याशी जोडलेलं आहे. लहानपणी मला आठवतं, मी माझ्या नानीच्या घरी उन्हाळा घालवायचे. दिवस अगदी साधेपणाने जायचे - गप्पा मारणं, घरकामात मदत करणं किंवा फक्त एकत्र बसणं. त्या क्षणांत एक वेगळं शांतपण होतं. आजही उन्हाळा म्हणजे मला तीच ऊब आणि स्थिरता आठवते.

मुस्कान बामने, पुष्पा इम्पॉसिबल मधील शनाया, सांगते, माझ्यासाठी उन्हाळा म्हणजे नेहमीच स्वातंत्र्याची भावना आणि थोडं साहस. मला आठवतं, आम्ही नातेवाईकांकडे जायचो आणि बाहेर खूप वेळ घालवायचो. कधी मित्रांसोबत झाडावरून कच्चे आंबे तोडायचा प्रयत्न करायचो त्या छोट्या खोडकर क्षणांनी आणि कौटुंबिक वेळाने उन्हाळा खूप मजेदार व्हायचा. आजही त्या आठवणींनी चेहऱ्यावर लगेच हसू येतं.

सोनी सब वर पुष्पा इम्पॉसिबल आणि यादें पाहायला विसरू नका

## भारत सरकारने देशातील सर्व वीज ग्राहकांसाठी स्मार्ट मीटर लावणे अनिवार्य केले आहे

### यासाठी सेंट्रल इलेक्ट्रिसिटी अथॉरिटी नियम, २००६ मध्ये बदल करण्यात आला आहे.

भारत सरकारने देशभरातील सर्व वीज ग्राहकांसाठी स्मार्ट मीटर वापरणे अनिवार्य केले आहे. हे बदल सेंट्रल इलेक्ट्रिसिटी अथॉरिटी (मीटर बसविणे आणि संचालन) नियम, २००६ मध्ये सुधारणा करून लागू करण्यात आले आहेत. नवीन नियमांनुसार, ज्या भागात कम्युनिकेशन नेटवर्क उपलब्ध आहे, त्या ठिकाणी सर्व ग्राहकांना ठराविक कालावधीत स्मार्ट मीटर बसवणे आवश्यक असेल. हे काम केंद्र सरकारने ठरवलेल्या वेळेत पूर्ण करावे लागेल

सुधारित नियमांनुसार, ज्या भागात नेटवर्क उपलब्ध आहे, त्या भागातील ग्राहकांना वीज पुरवठा फक्त स्मार्ट मीटरद्वारेच केला जाईल. ज्या भागात कम्युनिकेशन नेटवर्क उपलब्ध नाही, त्या ठिकाणी राज्य वीज नियामक आयोगांना प्रीपेड मीटर बसवण्याची परवानगी देण्याचा अधिकार देण्यात आला आहे. या नियमांमध्ये असेही सांगितले आहे की सर्व प्रगत मीटरिंग पायाभूत सुविधा (एएमआय) प्रणालींमध्ये प्रीपेड सुविधा असणे आवश्यक आहे आणि त्या एकमेकांशी सुसंगत असाव्यात. तसेच, ओपन-ॲक्सेस ग्राहकांसाठी स्मार्ट मीटरची भूमिका देखील या सुधारित नियमांमध्ये स्पष्ट करण्यात आली आहे.

**ग्राहक सशक्तीकरण आणि वीज कंपन्यांना बळकटी**

स्मार्ट मीटर हे भारतातील सुरू असलेल्या ऊर्जा क्षेत्रातील सुधारणा यांचे एक महत्त्वाचे घटक आहेत. या मीटरमुळे वीज वापराचे मोजमाप रिअल-टाइममध्ये आणि दूरस्थ पद्धतीने करता येते, त्यामुळे मॅन्युअल रीडिंग किंवा अंदाजे बिलांची गरज राहत नाही. ग्राहकांसाठी याचा फायदा म्हणजे बिल अचूक आणि पारदर्शक मिळते. तसेच, वीज वापराची माहिती मिळाल्याने ऊर्जा व्यवस्थापन अधिक चांगल्या पद्धतीने करता येते. स्मार्ट मीटरमुळे दिवसाच्या वेगवेगळ्या वेळेनुसार वीज दर लागू करता येतात, त्यामुळे ग्राहक कमी दराच्या वेळेत वीज वापर बदलू शकतात. वीज वितरण कंपन्यांसाठी स्मार्ट मीटरमुळे कामकाज अधिक कार्यक्षम होते आणि महसूल प्राप्ती सुधारण्यास मदत होते. चोरी, मीटरमध्ये छेडछाड आणि बिलिंगमधील त्रुटी यामुळे होणारे नुकसान कमी होते. स्मार्ट मीटरमधून मिळणारा रिअल-टाइम डेटा मागणीचे अचूक अंदाज, वीज पुरवठा खंडित झाल्यास त्याचे व्यवस्थापन आणि ग्रिड नियोजन अधिक चांगले करण्यास मदत करतो. नवीन ऊर्जा स्रोत आणि विकेंद्रित वीज निर्मिती वाढत असताना या सुधारणा अधिक महत्त्वाच्या ठरत आहेत.

**देशभरात स्मार्ट मीटरची अंमलबजावणी**

भारत सरकारने सुधारित वितरण क्षेत्र योजनेअंतर्गत (ठअ्‌डड) स्मार्ट मीटर बसवण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. उद्योग क्षेत्राच्या अंदाजानुसार, देशभरात आतापर्यंत ४.५ कोटींपेक्षा जास्त स्मार्ट मीटर बसवले गेले आहेत.

हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक श्री.शशिकांत आकाराम पाटील यांनी प्रीतिसंगम प्रिंटर्स, कोयना औद्योगिक वसाहत, मलकापूर-कराड येथे छापून गोदावरी प्लाझा, हेड पोस्टाजवळ, शनिवार पेठ कराड, येथे प्रसिद्ध केले आहे. या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. R.N.I.No.MAHMAR./२००१/१०३३८ रजिस्टर No.MAHMAR/14511/13/1/96/Te पोस्ट परवाना No./KRDDN/008/2024-2026 *मुख्य कार्यालय:- गोदावरी प्लाझा, हेड पोस्ट जवळ, शनिवार पेठ कराड, जि.सातारा, पिनकोड - ४१५११० फोन (०२१६४)२२७७२५,,फॅक्स २२६९२५, * सातारा कार्यालय:- संजीवन सीटी स्कॅन शेजारी, सिव्हील हॉस्पिटल रोड, सातारा फोन नं:-९२२६३९८८१७ RNI.mar/२००१/१०३३८.
email-pritisangamkarad@gmail.com

# प्रवीण काकडे 'महाराजा यशवंतराव होळकर' पुरस्काराने सन्मानित

## शिक्षण-समाजकार्याच्या सातत्यपूर्ण वाटचालीची दखल ;चांदवड येथे मान्यवरांच्या उपस्थितीत गौरव

**कराड/प्रतिनिधी : –**

सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात सातत्याने उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कराड तालुक्यातील धोंडेवाडी येथील प्रवीण काकडे यांना प्रतिष्ठेचा 'श्रीमंत महाराजा यशवंतराव होळकर समाजसेवा राज्यस्तरीय पुरस्कार' प्रदान करून सन्मानित करण्यात आले. नाशिक जिल्ह्यातील चांदवड येथे पार पडलेल्या भव्य सोहळ्यात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.



अहिल्यादेवी सामाजिक व शैक्षणिक विकास ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष तसेच ऑल इंडिया धनगर समाज महासंघाचे प्रदेशाध्यक्ष म्हणून कार्यरत असलेल्या काकडे यांच्या समाजाभिमुख उपक्रमांची राज्यस्तरावर दखल घेत आदिवासी धनगर समाज साहित्य संमेलनाच्या वतीने हा सन्मान देण्यात आला. अमरजीत राजे जाहगीरदार यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला.

या सोहळ्यास विविध क्षेत्रांतील मान्यवरांची उपस्थिती लाभली होती. शैक्षणिक, सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातील दिग्गजांनी काकडे यांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या उपक्रमांचे कौतुक केले.

प्रवीण काकडे यांनी, गेल्या अनेक वर्षांपासून ग्रामीण व दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विशेष प्रयत्न केले आहेत. त्यांनी आतापर्यंत सुमारे ५ हजार विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप केले असून शिक्षणाबाबत जनजागृतीचे विविध उपक्रम राबवले आहेत.

सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड, कोल्हापूर, सांगली, सातारा आणि पुणे जिल्ह्यांतील दुर्गम भागांमध्ये महिलांसाठी साडी व सॅनिटरी पॅड वाटप, सामाजिक जागृती अभियान अशा उपक्रमांद्वारे त्यांनी समाजाशी नाळ जोडली आहे. नोकरी सांभाळत त्यांनी हे कार्य सातत्याने सुरू ठेवले आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी वर्षानिमित्त राज्यभर महिला सन्मान सोहळ्यांचे आयोजन करून कर्तृत्ववान महिलांचा गौरव करण्यात आला. कराड, पुणे व मुंबई येथे शेकडो महिलांचा सन्मान करण्यात आला.

तसेच कराड येथे एकाच वेळी २४५ विद्यार्थ्यांना 'शिक्षण रत्न' पुरस्कार देऊन विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला प्रोत्साहन देण्यात आले. या सन्मानाबद्दल विविध क्षेत्रांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# 'माझं गाव आरोग्य संपन्न गाव' अभियान यशस्वी करणार

## राजेश्वरी नाईक

**शिराळा/प्रतिनिधी : –**

ग्रामीण भागातील आरोग्याच्या सेवा प्राथमिक आरोग्य केंद्राच्या माध्यमातून गतिमान करण्यासाठी जिल्हा परिषदेच्या माध्यमातून प्रयत्न करणार असून, 'माझं गाव आरोग्य संपन्न गाव' या महत्वकांक्षी अभियानासाठी सर्व गावचे सरपंच, अंगणवाडी सेविका, आशा वर्कर यांची एकत्रित बैठक घेऊन हे अभियान यशस्वी करण्यासाठी आवाहन करणार असल्याचे प्रतिपादन जिल्हा परिषद सदस्य राजेश्वरी नाईक यांनी केले.



अंत्री बुद्रुक प्राथमिक आरोग्य केंद्र व शिरशी प्राथमिक आरोग्य केंद्र (ता. शिराळा) येथे नियमक समिती व जन आरोग्य समितीच्या झालेल्या बैठकीमध्ये अध्यक्षस्थानावरून त्या बोलत होत्या. यावेळी जिल्हा परिषदेचे माजी सदस्य रणधीर नाईक, पंचायत समिती सदस्य रवींद्र आढाव, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. साकेत पाटील, वैद्यकीय अधिकारी डॉ. गणेश राजमाने व वैद्यकीय अधिकारी डॉ. विशाल पवार यांची प्रमुख उपस्थिती होती.

शिरशी प्राथमिक केंद्र व अंत्रि बुद्रुक प्राथमिक आरोग्य केंद्राच्या अधिकाऱ्यांच्या कडून सध्या चालू असलेल्या कामकाजा बाबत व प्राथमिक आरोग्य केंद्राला भेडसावणाऱ्या अडवाणी यांची सविस्तर चर्चा राजेश्वरी नाईक व रणधीर नाईक यांनी केली.

डॉ. साकेत पाटील व गणेश राजमाने यांनी 'माझे गाव आरोग्य संपन्न गाव' हे महत्वकांक्षी अभियान राबवण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या कार्यक्षेत्रामधील ग्रामपंचायतीने सहकार्य करण्याची अपेक्षा व्यक्त केली. यावेळी सर्व सरपंच निमंत्रित सदस्य उपस्थित होते.

रणधीर नाईक म्हणाले, शिराळा तालुका हा ग्रामीण व डोंगरी तालुका असल्यामुळे येथील जनतेला आरोग्याच्या दृष्टीने फार मोठा संघर्ष करावा लागत आहे. उपचारासाठी शहराच्या ठिकाणी जाणे परवडत नसल्यामुळे प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये जर चांगले उपचार मिळाले तर लोकांना निश्चितपणे याचा फायदा होणार आहे. शिराळा तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या सेवा गतिमान करण्यासाठी प्रयत्नशील राहणार आहे.

यावेळी शिरशी सरपंच स्मिता भोसले, अंत्रि सरपंच सुजाता पाटील, आनंद कुंभार, संभाजी पाटील, संतोष मादळे, नामदेव महीन, राजेश चव्हाण, प्रकाश पाटील, गणपती भालेकर, सचिन उर्फ पिनू पाटील, डॉ. विशाल पवार, सुपरवायझर ए.आर. पाटील, देसाई दत्तात्रय सूर्यवंशी, श्रद्धा पाटील व सर्व निमंत्रित सदस्य उपस्थित होते.

# वाळव्यात भिमशक्ती मंडळाच्यावतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी

**ईश्वरपूर/प्रतिनिधी:–**

वाळवा येथील भिमशक्ती मंडळाच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. युवानेते गौरव नायकवडी यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन झाले. डॉ. नागनाथांना नायकवडी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारात साम्य असून त्यांचा कृतिशील वारसा पुढे चालवूया. असे प्रतिपादन त्यांनी केले, गावातील महिलांनी मोठ्या संख्येने प्रथमच अनवाणी पावलांनी अंकलखोप ते वाळवा भीमज्योत आणली. या ज्योतीचे वाळवा गावामध्ये सर्वत्र स्वागत करण्यात आले.

यावेळी लोकनियुक्त सरपंच संदेश कांबळे म्हणाले, वाळवा - हुतात्मा चौक येथे लवकरच छत्रपती शिवाजी महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पुतळे उभा करु. त्या दृष्टीने ग्रामपंचायतीने ठराव केला आहे. समाजात गोर-गरिबांनी गुलामगिरीतून बाहेर पडले पाहिजे. बाबासाहेबांनी समतेचा संदेश देत शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा. असा संदेश दिला आहे, शंभर दिवस शेळी होऊन जगण्यापेक्षा चार दिवस वाघ होऊन जगूया. ठराविक भागापुरती जयंती मर्यादीत न करता संपुर्ण गावाला सोबत घेऊन जयंती साजरी केली आहे. इथुन पुढेही अशीच जयंती साजरी करू असे त्यांनी सांगितले. हुतात्मा चौक येथे सरपंच संदेश कांबळे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करण्यात आले.



यावेळी माजी उपसरपंच पोपट अहीर, पै. नंदू पाटील, सेवानिवृत्त कृषी अधिकारी अजित वलांडकर, संजय अहिर व मान्यवरांच्याही हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. मनोज धनवडे, दीपक सोनवणे, सागर कांबळे व सर्व कार्यकर्त्यांनीच संयोजन केले. डॉ. नागनाथअण्णा नायकवडी श्रमिकनगर येथे साधना कांबळे, सौ. रांजणे यांच्या हस्ते प्रतिमा पूजन झाले. अंकलखोपहुन आणलेली भीमज्योत घेऊन पदाधिकाऱ्यांनी डॉ. नागनाथअण्णांच्या समाधीचे दर्शन घेतले. चांदोली वसाहत येथे ग्रामस्थांच्या हस्ते प्रतिमा पूजन व बुद्ध वंदना घेण्यात आली, कोटभाग महात्मा फुलेनगर येथे ज्योतीचे स्वागत करण्यात आले.

नूतन जिल्हा परिषद सदस्य, तालुका पंचायत सदस्या प्राची अहिर व रूपाली पाटील यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. हुतात्मा बँकेचे संचालक पोपट कांबळे, सुनंदा धनवडे, साधना कांबळे यांनी प्रतिमा पूजन व कार्यक्रमाचे संयोजन केले. स्वागत व प्रास्ताविक अरविंद कांबळे यांनी केले. सरपंच संदेश कांबळे यांनी यावेळी मनोगत व्यक्त केले. सौ. व श्री प्रवीण कांबळे यांनी या कार्यक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेतला. सायंकाळी हुतात्मा चौक येथून ट्रॅक्टर ट्रॉलीमध्ये सजवलेल्या विविध रंगी फुलांनी सजवलेल्या बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची उत्साहपूर्ण वातावरणामध्ये पारंपारिक वाद्यांच्या गजरात डॉल्बीमुक्तीचा संदेश देत सवाद्य मिरवणूक काढण्यात आली.

या मिरवणुकीमध्ये असंख्य स्त्री पुरुष, तरुण मुले, मुली सहभागी झाले होते. दरम्यान वाळवा ग्रामपंचायतीमध्ये सुद्धा सरपंच संदेश कांबळे, उपसरपंच मिलिंद थोरात, माजी उपसरपंच चंद्रशेखर शेळके व शर्मीली अहीर, पांडुरंग माळी, अमोल गायकवाड यांच्या हस्ते प्रतिमा पुजन करणेत आले. सरपंच संदेश कांबळे यांनी बाबासाहेब आंबेडकर यांच्या विषयी मनोगत व्यक्त केले.

# सातारा नगरपरिषदेला कूपर कॉर्पोरेशनचा सीएसआरमधून ट्रॅक्टर; स्वच्छता व हरित उपक्रमांना चालना

**सातारा/प्रतिनिधी:–**

शहरातील स्वच्छता आणि हरित विकासकामांना गती देण्यासाठी कूपर कॉर्पोरेशन प्रा. लि., सातारा यांनी आपल्या सीएसआर उपक्रमांतर्गत सातारा नगरपरिषदेला ट्रॅक्टर प्रदान केला. या ट्रॅक्टरच्या लोकार्पणाचा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.



कंपनीचे चेअरमन अँड मॅनेजिंग डायरेक्टर फरोख कूपर व डायरेक्टर जाल कूपर यांच्या हस्ते नगराध्यक्ष अमोल मोहिते आणि उपनगराध्यक्ष ॲड. डी. जी. बनकर यांच्याकडे ट्रॅक्टरची चावी सुपूर्द करण्यात आली. यावेळी ट्रॅक्टरचे पूजन नगराध्यक्षांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमादरम्यान नगराध्यक्ष अमोल मोहिते व उपनगराध्यक्ष डी. जी. बनकर यांनी फरोख कूपर यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला व कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी कूपर कॉर्पोरेशनच्या वतीनेही नगरपरिषद पदाधिकाऱ्यांचा सन्मान करण्यात आला.

मनोगतात बोलताना नगराध्यक्ष मोहिते म्हणाले की, कूपर कॉर्पोरेशनने साताऱ्याच्या विकासासाठी सातत्याने सामाजिक बांधिलकी जपत योगदान दिले असून, शहराला गरज भासल्यास कंपनी नेहमी पुढाकार घेते.

या प्रसंगी कूपर कॉर्पोरेशनचे डायरेक्टर असलम फरास, आर्थिक दुर्बल घटक समितीचे सभापती संकेत साठे, नगरपरिषदेचे वृक्ष विभाग प्रमुख दिग्विजय गाढवे तसेच कंपनीचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

सीएसआर अंतर्गत मिळालेला हा ट्रॅक्टर शहरातील झाडांना पाणी देणे, रोड डिव्हायडरमधील वृक्षांची देखभाल आणि स्वच्छता कामासाठी उपयुक्त ठरणार असून, त्यामुळे नगरपरिषदेच्या कामकाजात अधिक कार्यक्षमता येईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

# प्राथमिक शिक्षक बँकेस प्रियाताई शिंदे यांची सदिच्छा भेट

**सातारा/प्रतिनिधी : –**

सातारा जिल्हयातील प्राथमिक शिक्षकांची मातृसंस्था असलेल्या प्राथमिक शिक्षक सहकारी बँकेचा वर्धापन दिन १७ एप्रिल रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमाला जिल्हा परिषद अध्यक्षा सौ प्रियाताई शिंदे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

वर्धापन दिनाचे औचित्य साधून बँकेच्या प्रगतीचा आढावा घेणेत आला. तसेच शतक महोत्सवी वाटचालीत सातत्याने होत असलेल्या प्रगतीबद्दल अनेक मान्यवरांनी समाधान व्यक्त केले. बँकेच्या आजवरच्या वाटचालीत विविध शिक्षक संघटनाचे पदाधिकारी आजी माजी चेअरमन, व्हा. चेअरमन व संचालक सदस्य ,सभासद बंधू भगिणी आणि कर्मचारी यांनी दिलेल्या योगदानाबद्दल कौतुक करणेत आले. तसेच सर्व कर्मचा-यांनी एकदिलाने बँकेच्या उज्वल भविष्यासाठी कटिबद्ध राहण्याचा निर्धार केला.



यावेळी डॉ.सौ. प्रियाताई शिंदे यांनी, प्राथमिक शिक्षक सहकारी बँकेच्या माध्यमातून शिक्षकांना

आर्थिक बळ मिळत असलेचे सांगितले. तसेच बँकेच्या विविध योजनाबद्दल समाधान व्यक्त करून बँकेने भविष्यातही नाविण्यपूर्ण योजना राबवाव्यात असे आवाहन केले. बँकेस वसुलीकामी जिल्हा परिषद मार्फत भरीव सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

बँकेचे चेअरमन विजय ढमाळ यांनी, सभासदांच्या हितासाठी राबवत असलेल्या योजनांची माहिती दिली.तसेच सभासद,खातेदार यांना विनम्र व तत्पर सेवा देण्यासाठी बँक नेहमीच कटीबद्ध असल्याचे सांगितले.

वर्धापन दिन सोहळ्यासाठी महाराष्ट्र राज्य शिक्षक संघ संपर्कप्रमुख सिद्धेश्वर पुस्तके, जि.प. सदस्य अजित साळुंखे, महेंद्र जानुगडे विद्यमान संचालक तथा अध्यक्ष सातारा जिल्हा प्राथमिक शिक्षक संघ, तसेच बँकेचे व्हा. चेअरमन नितीन फरांदे यांच्या समवेत संचालक ज्ञानबा ढापरे, नितीन काळे, किरण यादव, पुष्पलता बोबडे, निशा मुळीक, विशाल कणसे, नितीन राजे, तानाजी कुंभार, विजय शिर्के, संजय संकपाळ, शशिकांत सोनवलकर, राजेंद्र बोराटे, नितीन शिर्के, सुरेश पवार, नवनाथ जाधव शहाजी खाडे, संजीवन जगदाळे, विजय बनसोडे, किरण फाळके अध्यक्ष कोरेगाव तालुका शिक्षक समिती, सभासद गणेश लोखंडे, बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आण्णासाहेब भोसले, सर्व अधिकारी व सेवक वर्ग उपस्थित होते.

# पुण्यातील बहुराष्ट्रीय उद्योगाला आदर्शच्या विद्यार्थ्यांची भेट

## रँडेक फास्टनर्स येथे अभ्यास सहल; उत्पादन प्रक्रिया, गुणवत्ता नियंत्रणाचे थेट निरीक्षण

**विटा/प्रतिनिधी : –**

विटा येथील आदर्श इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड रिसर्च सेंटरच्या यांत्रिकी अभियांत्रिकी विभागाने विद्यार्थ्यांच्या औद्योगिक ज्ञानवृद्धीसाठी पुणे येथील रँडेक फास्टनर्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (पिरंगुट) या बहुराष्ट्रीय कंपनीला अभ्यास सहल आयोजित केली. द्वितीय व तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांनी या सहलीत उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.



या औद्योगिक भेटीदरम्यान विद्यार्थ्यांना साहित्यविज्ञान, धातुशास्त्र, उत्पादन प्रक्रिया, यंत्र रचना तसेच मापनशास्त्र आणि गुणवत्ता नियंत्रण या विषयांचे प्रत्यक्ष उद्योगातील अनुप्रयोग समजून घेण्याची संधी मिळाली. वर्गात शिकलेल्या सैद्धांतिक संकल्पना प्रत्यक्ष उत्पादन प्रक्रियेत कशा वापरल्या जातात, याचा सखोल अनुभव विद्यार्थ्यांनी घेतला.

कंपनीतील अत्याधुनिक यंत्रसामग्री, उत्पादन टप्पे आणि गुणवत्ता तपासणी पद्धतींचे विद्यार्थ्यांनी जवळून निरीक्षण केले. या सहलीमुळे त्यांच्या तांत्रिक ज्ञानासोबतच औद्योगिक दृष्टिकोन अधिक व्यापक झाला.

या सहलीचे आयोजन व मार्गदर्शन प्रा. व्ही. पी. पाटील, प्रा. आर. टी. वाघमारे आणि प्रा. आर. बी. पाटील यांनी केले. त्यांच्या नेतृत्वाखाली ही सहल शिस्तबद्ध आणि ज्ञानवर्धक ठरली.

या उपक्रमासाठी संस्थेचे संस्थापक ॲड. सदाशिवराव पाटील यांचे मार्गदर्शन, अध्यक्ष ॲड. वैभव पाटील यांचे प्रोत्साहन, संचालिका पूजा पाटील यांचे सहकार्य, तसेच प्राचार्य डॉ. पी. एस. पाटील, रजिस्ट्रार, अधिष्ठाता, विभागप्रमुख आणि प्राध्यापकांचे योगदान लाभले.

अशा औद्योगिक सहलींमुळे विद्यार्थ्यांचे व्यावहारिक ज्ञान, आत्मविश्वास आणि उद्योग क्षेत्रातील समज अधिक बळकट होत असल्याचे मत विभागप्रमुखांनी व्यक्त केले. भविष्यातही अशा उपक्रमांचे आयोजन सुरू ठेवण्याचा निर्धार विभागाने व्यक्त केला आहे.

# पार्वती रजपूत यांचे निधन

**ईश्वरपूर/प्रतिनिधी:–**

ईश्वरपूर-शिराळा नाका येथील पार्वती रंगराव रजपूत (वय ९१) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले.



त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, सुना व नातवंडे असा परिवार आहे. रक्षाविसर्जनविधी सोमवार दि.२० एप्रिल रोजी सकाळी ९ वाजता होणार आहे.



बनवडी:(कै.)रामराव निकम बी एड महाविद्यालयाच्या आंतरवासिता उपक्रमाचे उद्घाटन करताना मान्यवर

# कै.रामराव निकम बी एड महाविद्यालयाचा आंतरवासिता उपक्रम संपन्न

**कराड/प्रतिनिधी:–**

बनवडी येथील जागृती विद्यामंदिर येथे इंदोलीच्या (कै.) रामराव निकम शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील प्रथम वर्षातील प्रीतिसंगम गटाच्या छात्र अध्यापकांचा आंतरवासीता उपक्रम उत्साहात पार पडला. जागृतीचे मुख्याध्यापक एस.बी.चव्हाण यांच्या हस्ते उद्घाटन झाले. प्रा. प्रवीण सोनावले प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. त्यांनी उपस्थितांना शब्द रूप शक्ती दे या विषयावर मार्गदर्शन केले. शब्द आपले आयुष्य घडवू शकतात. असे त्यांनी सांगितले.

चव्हाण यांनी प्रास्ताविक केले. रुपाली नलवडे यांनी सूत्रसंचालन केले. व दिपाली पाटील यांनी आभार मानले. या उपक्रमाच्या समारोप व बक्षीस वितरणप्रसंगी जागृती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शंकरराव खापे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. मुख्याध्यापक चव्हाण अध्यक्षस्थानी होते. यावेळी (कै.) रामराव निकम बी एड महाविद्यालयाच्या प्राचार्या प्रा.एन.एन. कुराडे, जागृतीच्या शिक्षिका सौ. कदम, सर्व शिक्षक तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. यावेळी आंतरवासीता कालावधीत घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांचे बक्षीस वितरण करण्यात आले. चव्हाण यांनी प्रास्ताविक केले. रुपाली नलवडे व दिपाली पाटील यांनी सूत्रसंचालन केले. कोमल जाफळे यांनी आभार मानले.

# यशोदा पब्लिक स्कूलचा दहावी सीबीएसई बोर्ड परीक्षेत शंभर टक्के निकाल

**सातारा/प्रतिनिधी:–**

सातारा शहरातील नामांकित यशोदा पब्लिक स्कूलने सेंट्रल बोर्ड ऑफ सेकंडरी एज्युकेशन (उइडए) दहावीच्या परीक्षेत यंदा उल्लेखनीय कामगिरी करत शंभर टक्के निकालाची उज्ज्वल परंपरा कायम राखली आहे. विद्यार्थ्यांच्या जिद्दीने केलेल्या अभ्यासासोबतच शिक्षकांचे समर्पित मार्गदर्शन आणि पालकांचा ठाम विश्वास या त्रिसूत्रीमुळे हे यश संपादन झाले आहे.



यंदाच्या परीक्षेत संस्कृती शिंदे हिने ९६.४ टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला, तर वेदांत लवंत याने ९६ टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले. तसेच आर्या दांगे हिने ९५.२ टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक पटकावत शाळेचा मान उंचावला. या तिघांसह इतर विद्यार्थ्यांनीही उत्कृष्ट गुण मिळवत शाळेच्या यशात मोलाची भर घातली आहे. विद्यार्थ्यांच्या या उज्ज्वल कामगिरीमुळे शाळा परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या घवघवीत यशानिमित्त शाळेत गुणवंत विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला. या प्रसंगी विद्यार्थ्यांचा सत्कार प्रा. डॉ. दशरथ सगरे यांच्या हस्ते करण्यात आला यावेळी प्राचार्या अमिता डोगरा प्रमुख उपस्थित होत्या. विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ, स्मृतिचिन्ह व अभिनंदनपत्र देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाला शिक्षक, पालक तसेच विद्यार्थी उपस्थित होते.

समारंभात बोलताना प्रा. डॉ. दशरथ सगरे यांनी विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करत त्यांच्या चिकाटीचे आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांचे कौतुक केले. त्यांनी सांगितले की, आजच्या स्पर्धात्मक युगात विद्यार्थ्यांनी केवळ पाठ्यपुस्तकांपुरते ज्ञान मर्यादित न ठेवता नव्या तंत्रज्ञानाशी सुसंगत कौशल्ये आत्मसात करणे आवश्यक आहे. शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच व्यक्तिमत्त्व विकास, नैतिक मूल्ये आणि नवोपक्रमशील विचारसरणी विकसित होणे ही काळाची गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले.

यशोदा पब्लिक स्कूलमध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध शैक्षणिक आणि सहशैक्षणिक उपक्रम सातत्याने राबविले जातात. आधुनिक अध्यापन पद्धती, अनुभवी शिक्षकवर्ग, डिजिटल साधनांचा प्रभावी वापर आणि विद्यार्थीकेंद्रित शिक्षण या वैशिष्ट्यांमुळे शाळेने अल्पावधीतच गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. या प्रेरणादायी वातावरणामुळे विद्यार्थ्यांना आपल्या क्षमतांचा सर्वोत्तम विकास करण्याची संधी मिळते.

शाळेच्या या शंभर टक्के निकालामुळे पालक, शिक्षक आणि व्यवस्थापन यांच्यात समाधानाचे वातावरण असून सर्व स्तरांतून विद्यार्थ्यांचे कौतुक होत आहे. भविष्यातही अशाच प्रकारे उत्कृष्ट शैक्षणिक परंपरा जोपासण्याचा निर्धार शाळेने व्यक्त केला आहे.

# बळीराम सूर्यवंशी यांचे निधन

**पाटण/प्रतिनिधी:–**

सूर्यवंशीवाडी ( सांगवड ) ता. पाटण येथील ज्येष्ठ नागरिक बळीराम पांडुरंग सूर्यवंशी ( भाऊ) यांचं वयाच्या ६५ व्या वर्षी दुःखद निधन झाले.



त्यांच्या पश्चात तीन मुली एक मुलगा सुना नातवंडे भाऊ भाऊजय असा परिवार आहे. त्यांचा रक्षा विसर्जन विधि आज रविवार दि. १९ रोजी सकाळी नऊ वाजता सूर्यवंशीवाडी येथे होणार आहे.

# वीजचोरीप्रकरणी एकावर गुन्हा दाखल

**सातारा / प्रतिनिधी:–**

मल्हारपेठ (सातारा) येथील एकावर वीज चोरीप्रकरणी गुन्हा दाखल झाला आहे. अमित धनाजी सावंत (रा. मल्हारपेठ, ता. जि. सातारा) असे वीज चोरी गुन्हा जाखल झालेल्या संशयीताचे नाव आहे. वीज कपंनी अधिकारी वैभव मदने यांनी याबाबत सातारा शहर पोलिसांत तक्रार दिली आहे. सावंत यांनी सन २०१९ ते फेब्रुवारी २०२६ दरम्यान वीज चोरी केल्याचे निदर्श नास आल्यानंतर महावितरणच्यावतीने ही कारवाई करुन त्यांच्याकडून दंडही वसूल करण्यात आला.

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजमध्ये मोफत नेत्र तपासणी शिबिर

## ४०० जणांनी घेतला लाभ

**ईश्वरपूर / प्रतिनिधी:–**

महात्मा फुले शिक्षण संस्था यांच्या कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज येथे हेल्थ सेंटर, जिमखाना विभाग, एनसीसी विभाग आणि नंदादीप नेत्रालय यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत नेत्र तपासणी शिबिर उत्साहात पार पडले. या शिबिरास विद्यार्थी, पालक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून एकूण ४०० जणांनी तपासणीचा लाभ घेतला.



शिबिराचे उद्घाटन प्राचार्य डॉ. नितीन शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी नंदादीप नेत्रालयातील तज्ज्ञांनी अत्याधुनिक मशिनरी आणि एआय तंत्रज्ञानावर आधारित रोबोटिक मोतीबिंदू शस्त्रक्रिया तसेच रिफ्रॅक्टिव्ह सर्जरीबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

शिबिरामध्ये डोळ्यांचे नंबर तपासणी, मोतीबिंदू तपासणी, डोळे कोरडे पडणे, डोळ्यांवरील मांस वाढणे आदी समस्यांची तपासणी करण्यात आली. तसेच लॅसिक सर्जरीद्वारे चष्म्याचा नंबर कायमस्वरूपी कसा दूर करता येतो, याबाबतही विशेष समुपदेशन करण्यात आले.

या उपक्रमाला सरोज पाटील, दिपक पाटील आणि प्रा. स्मिता पाटील यांनी भेट दिली.

यावेळी उपप्राचार्य डॉ. प्रकाश गायकवाड, डॉ. संदीप पाटील, प्रा. संतोष पाटील, प्रा. मिलिंद खंडेलोटे, सायली जाधव यांच्यासह महाविद्यालयाचा कर्मचारी वर्ग उपस्थित होता. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. अमितराज माने, डॉ.बळीराम सावंत, प्रा. रणजीत चव्हाण, विवेक पोळ, वैष्णवी खोत, अजित पाटील आणि विजय कांबळे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# श्री डोंगराई देवी मंदिराच्या सुशोभीकरणासाठी ३५.७१ लाखांचा निधी :संग्रामसिंह देशमुख

**कडेगाव/प्रतिनिधी : –**

कडेगाव तालुक्यातील मौजे कडेपूर गावच्या श्रद्धेचा केंद्रबिंदू असलेल्या व महाराष्ट्रासह कर्नाटक राज्यातील लाखो भाविकांच्या श्रद्धास्थान असलेल्या श्री डोंगराई देवी तीर्थक्षेत्र मंदिराच्या सुशोभीकरणासाठी वन व पर्यटन विभागाअंतर्गत ३५.७१ लाखाचा निधी मंजूर करण्यात आला असल्याची माहिती सांगली जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष व भाजपाचे पलूस कडेगांव विधानसभा प्रमुख संग्रामसिंह संपतराव देशमुख यांनी पत्रकार परिषदेत दिली.




देशमुख म्हणाले, महाराष्ट्र शासनाच्या वन पर्यटन विभागाकडे पाठपुरावा केला होता. तात्कालीन वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या विशेष सहकार्याने ६.५ कोटीचा प्रोजेक्ट मंजूर झाला होता, त्यातील पहिल्या टप्प्यातील १.५ कोटीचे काम पूर्णत्वास असून, चालू वर्षी २०२६-२७ मध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, वनमंत्री गणेश नाईक, पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ३५.७१ लाखाचा निधी मंजूर झाला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सरकार सर्वसामान्य जनतेचा उत्कर्ष साधण्याचे काम करत आहे. पलूस-कडेगाव मतदारसंघाच्या विकासासाठी आपण सर्वोतोपरी प्रयत्न केले आहेत व यापुढेही केंद्र सरकार व राज्य सरकार यांच्याकडून लागेल तितका निधी मंजूर करून आणणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# मॉडेल शाळांमुळे पटसंख्या वाढेल

## शंभूराज देसाई; पाटणच्या पाणी योजनेला गती देणार, अधिकाऱ्यांना तत्काळ कामाचे निर्देश

**कराड/प्रतिनिधी : –**



जिल्हा परिषद शाळांचा दर्जा उंचावून त्यांना 'मॉडेल स्कूल'च्या रूपात विकसित केल्यास विद्यार्थ्यांची पटसंख्या घटण्याचा प्रश्न निर्माण होणार नाही, असा ठाम विश्वास राज्याचे पर्यटन व खनिकर्म मंत्री तथा सातारा जिल्ह्याचे पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी व्यक्त केला.

कराड तालुक्यातील वस्ती साकुर्डे येथील प्राथमिक शाळेच्या नूतनीकरण केलेल्या इमारतीच्या उद्घाटनानंतर ते माध्यमांशी बोलत होते. या शाळेसाठी पालकमंत्री झाल्यापासून विविध माध्यमांतून निधी उपलब्ध करून देण्यात आला असून, ग्रामस्थांनीही लोकवर्गणीतून सुमारे साडेआठ लाखांचा निधी उभारून योगदान दिले आहे. उत्कृष्ट इमारत, स्वच्छता आणि आधुनिक सोयीसुविधांमुळे ही शाळा खाजगी संस्थांनाही स्पर्धा देणारी 'मॉडेल स्कूल' ठरल्याचे त्यांनी सांगितले.

देसाई म्हणाले, २०२२ पासून जिल्ह्यातील प्राथमिक शाळांच्या पायाभूत सुविधांमध्ये मोठ्या प्रमाणात सुधारणा करण्यावर भर देण्यात आला. जिल्हा नियोजन समितीमार्फत निधी देऊन अनेक शाळा मॉडेल स्कूलमध्ये रूपांतरित झाल्या असून, आरोग्य क्षेत्रातही स्मार्ट पीएचसी उभारण्यात आल्या आहेत. वस्ती साकुर्डे शाळा ही त्याच उपक्रमाचा भाग असल्याचे त्यांनी नमूद केले.

दरम्यान, पाटण शहरातील पाणीटंचाईच्या प्रश्नावर बोलताना देसाई यांनी, विरोधकांच्या टीकेला उत्तर दिले. पाणीपुरवठा योजनेसाठी नगरपालिकेकडे असलेला निधी अपुरा पडल्याने काम रखडले होते. याबाबत पूर्वीच प्रस्ताव सादर करण्यात आला होता आणि त्याला तत्त्वतः मान्यता मिळाली होती. आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली नगरविकास विभागानेही या योजनेला तात्काळ मंजुरी दिली असल्याची माहिती त्यांनी दिली.

नगर प्रशासनाच्या बैठकीत जिल्हाधिकाऱ्यांसमोर संबंधित अधिकाऱ्यांना काम गतीने पूर्ण करण्याचे निर्देश दिले असल्याचे सांगत ते म्हणाले, मोठ्या शहरांमध्ये पाईपलाईन फुटल्यास काही तासांत दुरुस्ती होते. मग पाटणमध्येच विलंब का? ज्यांच्या नेतृत्वाखाली संस्था कार्यरत आहेत, त्यांनी अधिकाऱ्यांवर नियंत्रण ठेवायला हवे. त्यांना कामात तत्परता आणि जबाबदारीची जाणीव आवश्यक आहे. पाटण नगरवासीयांना नियमित व पुरेसा पाणीपुरवठा मिळावा, यासाठी ठेकेदार व मुख्याधिकाऱ्यांसोबत बैठक घेऊन काम तातडीने मार्गी लावले जाईल, असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

# गार्डीतील पोल्ट्री फार्ममध्ये तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या

**विटा/प्रतिनिधी : –**

खानापूर तालुक्यात गार्डी परिसरात एका परप्रांतीय तरुणाने पोल्ट्री फार्ममधील राहत्या खोलीत गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

गौरव अशोक पासवान (वय २०, मूळ रहिवासी बिहार) असे मृत तरुणाचे नाव आहे.

याबाबत पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, गौरव पासवान सध्या गार्डी येथील लकडे पोल्ट्री फार्ममध्ये वास्तव्यास होता. त्याचे वडील अशोक पासवान हे गेल्या वर्षभरापासून या फार्मवर काम करत आहेत. कुटुंबीयांच्या राहण्यासाठी त्यांना फार्मवरच खोली देण्यात आली होती.

गौरव पासवान हा पोल्ट्री फार्मवर न काम करता साळशिंगे परिसरात दुसरीकडे काम करत होता. दरम्यान, गुरुवारी दुपारी साडेतीनच्या सुमारास तो गार्डी येथील राहत्या खोलीत गेला आणि त्याने गळफास घेत आत्महत्या केली. ही बाब लक्षात येताच पोल्ट्री व्यवसायिक मुकुंद लकडे यांनी तत्काळ विटा पोलीस ठाण्याशी संपर्क साधला. त्यांनी स्वतः पोलिस ठाण्यात जाऊन या घटनेची फिर्याद नोंदवली आहे. विटा पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून, पंचनामा करून पुढील तपास सुरू आहे. आत्महत्येचे नेमके कारण अद्याप समोर आले नसून पोलिस अधिक तपास करत आहेत.

# शेतकऱ्यांच्या FRP थकबाकीवरून रयत क्रांती संघटना आक्रमक

**सातारा/प्रतिनिधी:–**

सातारा जिल्ह्यातील भुईंज येथील किसनवीर सहकारी साखर कारखान्याकडून ऊस उत्पादक शेतकऱ्यांची थकबाकी अद्यापही न दिल्याने नाराजी वाढत आहे. रयत क्रांती संघटनाच्या वतीने कारखाना प्रशासनाला निवेदन देत चार ते पाच दिवसांत गळीत हंगाम २०२५–२६ मधील एफआरपी (FRP) व जाहीर दराची संपूर्ण रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यावर वर्ग करण्याची मागणी करण्यात आली आहे.

संघटनेचे संस्थापक सदाभाऊ खोत यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा युवक अध्यक्ष प्रकाश साबळे यांनी हे निवेदन सादर केले. निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, अनेक शेतकऱ्यांचा ऊस गाळप होऊन तीन महिने उलटूनही त्यांना मोबदला मिळालेला नाही. त्यामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत.



यासंदर्भात कारखाना प्रशासनाने ऊस नियंत्रण कायद्याचे उल्लंघन केल्याचा आरोपही संघटनेने केला आहे. जर येत्या चार ते पाच दिवसांत शेतकऱ्यांची थकबाकी त्यांच्या खात्यावर जमा केली नाही, तर रयत क्रांती संघटना संबंधित शेतकऱ्यांसह कारखान्याच्या कार्यस्थळावर तीव्र आंदोलन छेडणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे.

या निवेदनाची प्रत भुईंज पोलीस ठाण्यासही देण्यात आली असून, संभाव्य आंदोलनाची जबाबदारी कारखाना प्रशासनावर राहील, असे संघटनेने स्पष्ट केले आहे.

# डवरी समाजाच्या घरांचा ३५ वर्षांचा वनवास संपला!

## आ. सत्यजित देशमुखांच्या हस्ते 'त्या' १८ कुटुंबांना हक्काच्या जागेचे आदेश वाटप

**शिराळा/प्रतिनिधी:–**

शिराळा येथील तहसील कार्यालयात शिराळा शहरातील ३० ते ३५ वर्षे प्रलंबित असलेल्या डवरी समाजाच्या घरांचा प्रश्न आज मार्गी लागला. डवरी समाजाचे शासकीय जागेवरील अतिक्रमण नियमानुकूल करणेचा आदेशांचे वाटप आमदार सत्यजित देशमुख यांच्या हस्ते करणेत आले.

या कार्यक्रमात पात्र १८ लाभार्थ्यांना ५०० चौरस फुट क्षेत्र असणारी जागा घरासाठी उपलब्ध होणाऱ्या आदेशांचे वितरण करण्यात आले.यावेळी प्रांतधिकारी श्रीनिवास अर्जुन, तहसीलदार शामला खोत, मुख्याधिकारी सुरज कांबळे, नगराध्यक्ष पृथ्वीसिंग नाईक, सम्राटसिंह शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.



यावेळी आमदार देशमुख यांनी सांगितले की, समाजातील सर्व घटकांना न्याय मिळावा, त्यांच्या हक्काचे प्रश्न मार्गी लागावेत आणि सर्वसामान्य नागरिकांना दिलासा मिळावा यासाठी शासन व स्थानिक प्रशासन सकारात्मकपणे कार्यरत आहे. डवरी समाजाच्या प्रलंबित प्रश्नांनाही प्राधान्याने न्याय देण्याचा प्रयत्न केला जात आहे. सर्वसामान्य नागरिकांना दिलासा मिळावा यासाठी शासन आणि स्थानिक प्रशासन सकारात्मकपणे काम करत असून, यापुढेही अशाच प्रकारे प्रलंबित प्रश्न सोडवण्यावर आमचा भर राहील.

या कार्यक्रमास माजी सभापती हणमंतराव पाटील, उपनगराध्यक्ष बसवेश्वर शेटे, बांधकाम सभापती राजसिंह पाटील, रमेश कांबळे, सचिन डांगे, कुलदिप निकम, अभिजीत यादव, अवधूत गायकवाड, प्राजक्ता कुलकर्णी, महिला व बालकल्याण सभापती सुनीता पाटील, निखिल शिंदे, सीमा कदम, अर्चना कदम ,काजल कांबळे, महेश पाटील, विक्रम बिळासकर, मोहन जिरंगे, वैभव कांबळे, शुभम देशमुख सागर कुरणे, ओकांर पाटील, दिपक नलवडे, नगरपंचायत कर्मचारी,डवरी समाजाचे बांधव, लाभार्थी तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वन्य प्रश्नांसंदर्भात संघटित होऊन प्रयत्न करावा लागेल

## शिवाजीराव नाईक; जिल्हा परिषद,पंचायत समितीचे सदस्य व नगरसेवकांचा नागरी सत्कार

**शिराळा/प्रतिनिधी : –**

तालुक्यातील पश्चिम विभागातील नागरिकांना वन्य विभागाच्या निष्काळजीपणामुळे मोठ्या प्रमाणावर वन्य प्राण्यांच्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. या विभागातील लोकांचे अनेक प्रश्न, त्याचबरोबर तालुक्यातील इतर गावातील प्रश्नसंदर्भात यापुढील काळात एकत्रित संघटित होऊन प्रयत्न करावा लागेल, असे मत माजी मंत्री शिवाजीराव नाईक यांनी व्यक्त केले.

मणदूर (ता. शिराळा) येथे शिराळा तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हा परिषद, पंचायत समितीचे सदस्य व शिराळा नगरपंचायतचे नगरसेवक यांचा नागरी सत्कार राज्याचे माजी मंत्री राष्ट्रवादी पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष शिवाजीराव नाईक, सांगली जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष माजी आमदार मानसिंगराव नाईक, रणधीर नाईक यांच्या हस्ते पार पडला. या कार्यक्रमावेळी नाईक बोलत होते.

या नागरी सत्कार सोहळ्याचे नियोजन पंचायत समितीचे उपसभापती मनीषा पाटील, जिल्हा परिषद सदस्य शीला मोहिते व मनदुर येथील ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले होते. यावेळी जिल्हा परिषद सदस्य राजेश्वरी नाईक शीला मोहिते, पंचायत समिती उपसभापती मनीषा पाटील, सदस्य रवींद्र आढाव, मोहन पाटील, सविता महाडिक, सायली पाटील, शिराळा नगरसेवक अभिजीत यादव, महेश खंडागळे ,सीमा कदम ,माधुरी गायकवाड ,सविता कांबळे, अर्चना कदम, लक्ष्मी कदम ,अभिजीत नाईक, रणजीतसिंह नाईक यांचा माजी मंत्री शिवाजीराव नाईक व माजी आमदार मानसिंगराव नाईक यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.



तर शिराळा पंचायत समितीचे माजी उपसभापती बी के नायकवडी ,राष्ट्रवादी पक्षाचे तालुकाध्यक्ष आनंदराव पाटील ,माजी सभापती एन डी लोहार, प्रकाश जाधव, मोहन पाटील, शंकर मोहिते, शिवाजी पाटील, कोंडीबा चौगुले, शंकर पाटील, कोंडीबा पाटील, विनोद पन्हाळकर, रघुनाथ पाटील, नेहा सूर्यवंशी, प्रमोद पाटील, के.वाय. भास्टे, वसंत पाटील यांचा मंणदूर ग्रामस्थांच्या वतीने यथोचित सत्कार करण्यात आला.

# शेतकऱ्यांनो, सातबाऱ्यावरील चुका आता चुटकीसरशी होणार दुरुस्त

## महाबळेश्वर तालुक्यात विशेष 'महाराजस्व समाधान' शिबिरांचा धडाका!

**पाचगणी/प्रतिनिधी:–**

महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वनविभागाच्या नवीन धोरणानुसार, 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर' अभियानाचा टप्पा आता महाबळेश्वर तालुक्यात मोठ्या उत्साहात राबविला जाणार आहे. हस्तलिखित सातबाऱ्याचे संगणीकरण करताना झालेल्या तांत्रिक चुकांमुळे अनेक शेतकरी बांधवांना अडचणींचा सामना करावा लागत होता. हीच समस्या मुळापासून उपटून काढण्यासाठी तहसीलदार सचिन म्हस्के यांनी तालुक्यात विशेष शिबिरांचे नियोजन केले असून, प्रत्यक्ष गावागावांत जाऊन सातबारा दुरुस्तीची मोहीम हाती घेतली आहे.

महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ च्या कलम १५५ नुसार, सातबाऱ्यातील नावांच्या चुका, क्षेत्रातील तफावत किंवा इतर तांत्रिक नोंदी दुरुस्त करण्यासाठी हे शिबीर सुवर्णसंधी ठरणार आहे. अनेकदा संगणीकृत सातबारा निघताना जुन्या हस्तलिखित नोंदी गाळल्या गेल्या आहेत किंवा त्या चुकीच्या पद्धतीने नोंदवल्या गेल्या आहेत. या सर्व त्रुटी दूर करण्यासाठी संबंधित सजांचे तलाठी आणि ग्राम महसूल अधिकारी नेमून दिलेल्या तारखांना सकाळीच गावात हजर राहतील. शेतकऱ्यांना तिथेच त्यांचे जुने हस्तलिखित सातबारे आणि नवे संगणीकृत सातबारे पडताळणीसाठी उपलब्ध करून दिले जाणार आहेत.

तालुक्यातील दुर्गम भागातील शेतकऱ्यांची सोय व्हावी यासाठी प्रशासनाने गावनिहाय वेळापत्रक जाहीर केले आहे. यामध्ये २० ते २२ एप्रिल दरम्यान मालकमपेठ, पाचगणी, भिलार, कुंभरोशी यांसारख्या मोठ्या सजांसह एकूण १७ गावांमध्ये ही प्रक्रिया चालेल. त्यानंतर २३ आणि २४ एप्रिल रोजी मेटगुताड, पारपार, खरोशीसह इतर गावांचा टप्पा पूर्ण केला जाईल. उचाट सजासाठी २२ व २३ एप्रिल, तर अहिर सजासाठी २० आणि २१ एप्रिल ही वेळ निश्चित करण्यात आली आहे. या नियोजित दिवशी तलाठी कार्यालय किंवा ग्रामपंचायत कार्यालयात हे काम चालणार आहे.

या मोहिमेबाबत अधिक माहिती देताना तहसीलदार सचिन म्हस्के यांनी सांगितले की, शेतकऱ्यांनी सातबाऱ्याची खात्री करून जर काही चुकीची नोंद आढळली, तर त्याच दिवशी तात्काळ अर्ज सादर करावा. प्राप्त अर्जांची तातडीने छाननी केली जाईल आणि सातबारा दुरुस्त करून पुन्हा निर्दोष सातबाऱ्याचे वाटप त्याच गावात केले जाईल. प्रशासनाच्या या 'दप्तर आपल्या दारी' उपक्रमामुळे शेतकऱ्यांचा तहसील कार्यालयात जाणारा वेळ आणि पैसा दोन्ही वाचणार आहेत. तरी महाबळेश्वर तालुक्यातील तमाम शेतकरी बांधवांनी या संधीचा लाभ घेऊन आपले सातबारे अद्ययावत करून घ्यावेत, असे कळकळीचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# शिवजयंतीनिमित्त कराडमध्ये वाहतुकीत बदल

## दुपारी २ ते रात्री १० दरम्यान मुख्य मार्ग बंद; दरबार मिरवणुकीमुळे शहरातील प्रमुख रस्त्यांवर निर्बंध

**कराड/प्रतिनिधी : –**

छत्रपती शिवाजी महाराज जयंती (परंपरेनुसार) २० एप्रिल रोजी कराड शहरात मोठ्या उत्साहात साजरी होत आहे. यानिमित्त आयोजित भव्य दरबार मिरवणुकीमुळे शहरातील वाहतुकीत तात्पुरते बदल करण्यात आले आहेत. ही मिरवणूक दुपारी २ ते रात्री १० या कालावधीत पार पडणार असून, त्यादरम्यान प्रमुख मार्गांवर वाहतूक निर्बंध लागू राहणार आहेत. पांढरीचा मारुती मंदिर येथून सुरू होणारी ही मिरवणूक जोतिबा मंदिर, कमानी मारुती मंदिर, दर्गा मोहल्ला, चावडी चौक, नेहरू चौक, आझाद चौक, यशवंत हायस्कूल मार्गे दत्त चौक येथे समारोप होणार आहे. मिरवणुकीत सुमारे १० ते १२ हजार नागरिक सहभागी होण्याची अपेक्षा असून, देखावे, चित्ररथ, घोडे व बॅण्ड पथकांचा समावेश असणार आहे. या पार्श्वभूमीवर कृष्णा सर्कल ते दत्त चौक या संपूर्ण मार्गावर वाहन पार्किंगला बंदी घालण्यात आली आहे. तसेच दत्त चौक, आझाद चौक, चावडी चौक, प्रीतिसंगम घाट या प्रमुख मार्गांवर सर्वसामान्य वाहनांना प्रवेश दिला जाणार नाही. काही मार्गांवर मिरवणूक पुढे सरकेपर्यंत पूर्णतः प्रवेशबंदी ठेवण्यात येणार आहे. वाहनचालकांसाठी पर्यायी मार्ग निश्चित करण्यात आले असून, आझाद चौक–सात शहीद चौक–जनकल्याण बँक मार्ग, तसेच शाहू चौक–पोपटभाई पेट्रोल पंप–भेदा चौक–विजय दिवस चौक या मार्गांचा वापर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

सैदापूर कॅनॉल, एस.टी. स्टॅण्ड परिसर आणि कोल्हापूर नाका मार्गावरही वाहतुकीचे नियोजन बदलण्यात आले आहे.दरम्यान, रुग्णवाहिका, अग्निशामक दल, पोलीस वाहने व इतर अत्यावश्यक सेवांना या निर्बंधातून सूट देण्यात आली आहे.कराड पोलिस प्रशासनाने नागरिकांनी संयम बाळगून वाहतूक बदलांचे पालन करावे, तसेच शक्यतो पर्यायी मार्गांचा वापर करून सहकार्य करावे, असे आवाहन केले आहे.

# साईतेजस्वी देशमुख यांची अर्थ व शिक्षण समितीच्या सदस्यपदी

**शिराळा/प्रतिनिधी:–**

सांगली जिल्हा परिषद सदस्या साईतेजस्वी सत्यजित देशमुख यांची अर्थ व शिक्षण समितीच्या सदस्य पदी निवड झाली आहे.

साई तेजस्वी देशमुख या कोकरुड जिल्हा परिषद मतदार संघातून मोठ्या मताधिक्याने निवडून आल्या आहेत. त्यांना मोठा राजकीय वारसा असून त्यांनी अल्पावधीत विकास कामांच्या जोरावरती सामाजिक प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी रस्त्यावर उतरून काम सुरू केले आहे. त्यांच्या कामाची वरिष्ठांनी दखल घेत त्यांना अर्थ व शिक्षण सदस्य म्हणून निवड केली आहे.



> दिवंगत नेते लोकनेते शिवाजीराव देशमुख,आमदार सत्यजीत देशमुख आणि आता साईतेजस्वी देशमुख यांची म्हणजे तिसरी पिढी जिल्हा परिषद विविध कमिटीच्या सदस्यपदी निवड झाली आहे.

या निवडीसाठी पालकमंत्री चंद्रकांत पाटील, आमदार विनय कोरे, आमदार सत्यजित देशमुख, जनसुराज्य पक्षाचे प्रदेशाध्यक्ष समित कदम, भाजपा जिल्हाध्यक्ष सम्राट महाडिक यांची विशेष सहकार्य मिळाले.

या निवडीबद्दल बोलताना साईतेजस्वी देशमुख म्हणाल्या की , महायुतीच्या वरिष्ठ नेत्यांच्या सहकार्यामुळे जिल्हा परिषद अर्थ व शिक्षण समितीच्या सदस्य पदी निवड झाली आहे. ग्रामीण भागातील शैक्षणिक बदल करून हा विभाग अधिक गतिमान शिक्षण प्रणाली करण्यासाठी प्रयत्न करू. महायुती नेत्याच्या मार्गदर्शनाखाली काम करू अशी ग्वाही दिली.

# क्रिकेट खेळताना स्टंप उखडल्याचा राग नरसिंहपूर येथे एकावर लोखंडी पळीने हल्ला

**ईश्वरपूर / प्रतिनिधी:–**

नरसिंहपूर (ता.वाळवा) येथे मुले क्रिकेट खेळताना स्टंप उखडल्याच्या कारणावरून सुरज बालेखान मुलाणी (वय ३५ रा. नरसिंहपूर, ता. वाळवा, जि. सांगली) यांच्यावर लोखंडी पळीने हल्ला केल्याची घटना घडली. याप्रकरणी रोहन अरुण कांबळे (रा. नरसिंहपूर) याच्यावर ईश्वरपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणी जखमी सुरज मुलाणी यांनी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. याबाबत माहिती अशी; १७ एप्रिल रोजी सायंकाळी साडेपाच वाजण्याच्या सुमारास नरसिंहपूर येथील घराचे बांधकाम सुरू असलेल्या ठिकाणी सुरज यांचा मुलगा व इतर मुले क्रिकेट खेळत होती. त्यावेळी रोहन कांबळे याने क्रिकेटचे स्टंप लाथाडल्याने वाद निर्माण झाला. त्याबाबत जाब विचारल्याचा राग मनात धरून त्याने हातातील लोखंडी पळीने सुरज मुलाणी यांच्या डोक्यात मारून जखमी केले. जखमी सुरज मुलाणी यांच्यावर उपजिल्हा रुग्णालय ईश्वरपूर येथे उपचार करण्यात आले. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करत आहेत.

# ईश्वरपूरमध्ये मटका अड्ड्यावर पोलिसांची कारवाई

## एकावर गुन्हा दाखल

**ईश्वरपूर / प्रतिनिधी:–**

मटका जुगार अड्ड्यावर कारवाई करत नितीन सुरेश सूर्यवंशी (वय ३०, रा. कामेरी रोड, ईश्वरपूर, ता. वाळवा, जि. सांगली) याच्यावर पोलिसांनी महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल केला आहे. शनिवारी दुपारी मटण मार्केट परिसरातील विजय सायकल मार्टच्या आडोशाला कारवाई करण्यात आली. या कारवाईत ८५५ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शनिवारी १८ एप्रिल रोजी दुपारी १.२० वाजण्याच्या सुमारास नितीन सूर्यवंशी हा बेकायदेशीररीत्या कल्याण मटका जुगाराचे आकडे कागदी चिठ्ठीवर लिहून लोकांकडून पैसे स्वीकारत असताना पोलिसांना आढळून आला.पोलिसांनी मटका जुगाराची चिठ्ठी, एक बॉलपेन व रोख ८५० रुपये असा एकूण ८५५ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

पोलीस शिपाई दिपक बाजीराव घस्ते यांनी फिर्याद दिली आहे.

# उलट्यांच्या त्रासानंतर रुग्णाचा मृत्यू; तपासाची मागणी

**सातारा/प्रतिनिधी:–**

सातारा तालुक्यातील गोवे येथील जयराम किसन बागल (वय ५५) यांना अचानक उलट्यांचा त्रास होऊ लागल्याने त्यांना तातडीने सिव्हिल हॉस्पिटल, सातारा येथे उपचारासाठी नेण्यात आले. मात्र तेथील डॉक्टरांनी तपासणी करून उपचार सुरू करण्यापूर्वीच संबंधित व्यक्ती मृत झाल्याचे घोषित केले.

या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट व्हावे यासाठी सखोल तपास करण्याची मागणी करण्यात येत आहे. या घटनेची खबर ओंकार जयराम बागल (वय २६) यांनी तालुका पोलिसांना दिली असून घटनेचा पुढील तपास पोलीस हवालदार कुमठेकर करत आहे.


MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM Tender Notice**

The office of Executive Engineer 400kV RS Division Karad , MSETCL invites online bids (SRM ETender) from reputed and registered & experienced contractors on Mahatransco SRM E-Tendering website **https://srmetender.mahatransco.in** for the following tender specification.

| Sr. No. | RFx No. | Name of tender | Amount of tender | Sale date of tender |
|---|---|---|---|---|
| 1 | 7000039629 | Engaging skilled labours against sanctioned vacant post of Tech- II (TS), Asst. Tech. (G), Driver, LDC (Outsource), Steno Typist & Peons (Unskilled) on outsourcing basis under 400 KV R.S. O&M Dn., Karad. | Rs. 87,19,201/- (Rs. Eighty Seven Lakhs Nineteen Thousand Two Hundred One Only) including GST | From 18.04.2026 @ 00:00 Hrs. To 02.05.2026 @ 23:59 Hrs. (Sale Closing Date). |

For further details visit our above said website.

**Contact Person:** The Dy. Executive Engineer, 400kV RS (O&M) Dn., Karad. (O): Phone No. 8411001442. e-mail:- ee3130@mahatransco.in

**Note :** All eligible contractors are mandated to get enrolled on SRM E-tendering portal & having digital signature (signing & encrypt-decrypt certificates).

**Sd/-**
**Executive Engineer**
**400kV RS (O&M) Dn., Karad**


# सुशोभीकरण की धोक्याची वाट?

## महाबळेश्वरच्या गजबजलेल्या मुख्य बाजारपेठेत प्लायवूडचा खेळ

**प्रतापगड/प्रतिनिधी : –**

पर्यटननगरी महाबळेश्वरच्या गजबजलेल्या मुख्य बाजारपेठेत सुरू असलेले सुशोभीकरणाचे काम गेल्या दोन वर्षांपासून रखडले असून, अर्धवट आणि निकृष्ट कामामुळे नागरिक व पर्यटकांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. छत्रपती शिवाजी महाराज चौक ते नेताजी सुभाषचंद्र बोस चौक या मुख्य मार्गावर रस्त्याच्या कामाच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात खड्डे करण्यात आले असून, त्यावर तात्पुरत्या स्वरूपात टाकण्यात आलेले प्लायवूड आता धोकादायक ठरत आहे.

ठेकेदाराकडून सुरुवातीला या खड्ड्यांवर मजबूत लोखंडी जाळी बसवण्याचे आश्वासन देण्यात आले होते. मात्र प्रत्यक्षात जाळी बसवण्याऐवजी लाकड प्लायवूड टाकून काम भागवले जात असल्याचे चित्र समोर आले आहे. विशेषतः छत्रपती शिवाजी महाराज चौक ते पोलीस स्टेशन दरम्यान अनेक ठिकाणी योग्य सुरक्षात्मक उपाययोजना करण्यात आलेल्या नाहीत.



दरम्यान, या प्लायवूडवरून सतत चारचाकी वाहने वर्दळ करत असल्याने अनेक ठिकाणी ते तुटले असून, खाली असलेले खड्डे अधिकच उघडे पडले आहेत. त्यामुळे चालणाऱ्या नागरिकांना तसेच वाहनधारकांना अपघाताचा मोठा धोका निर्माण झाला आहे. पर्यटन हंगामाच्या पार्श्वभूमीवर शहरात पर्यटकांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली असून, वयोवृद्ध नागरिक आणि लहान मुलांचा वावरही अधिक आहे. अशा परिस्थितीत या धोकादायक रस्त्यामुळे कोणतीही दुर्घटना घडू शकते, अशी भीती व्यक्त होत आहे.

रात्रीच्या वेळी परिस्थिती आणखी बिकट बनते. अनेक ठिकाणी पथदिवे बंद असल्याने तसेच दुकानांची प्रकाशयोजना कमी झाल्याने अंधारात खड्डे दिसत नाहीत. परिणामी, अंधारात चालताना किंवा वाहन चालवताना अपघात होण्याची शक्यता अधिक वाढली आहे.

याचबरोबर, मुख्य बाजारपेठेतील काम पूर्ण होण्याआधीच मारिपेठ परिसरात गटार कामाला सुरुवात करण्यात आल्याने शहरभर अर्धवट कामांचे जाळे पसरले आहे. ठिकठिकाणी खड्डे, बांधकाम साहित्य आणि घाण यामुळे शहराच्या सौंदर्यावरही परिणाम झाला आहे. जिकडे जावे तिकडे अर्धवट कामे आणि अव्यवस्था, अशी तीव्र प्रतिक्रिया नागरिकांकडून उमटत आहे.

सातारा जिल्ह्यात एकाचवेळी अनेक मंत्री असतानाही महाबळेश्वरसारख्या महत्त्वाच्या पर्यटनस्थळी अशी दुरवस्था का, असा सवाल उपस्थित होत आहे. स्थानिक आमदार आणि संबंधित मंत्री या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देतील का, याबाबत नागरिकांमध्ये चर्चा सुरू आहे.

दरम्यान, सार्वजनिक बांधकाम मंत्री छत्रपती शिवेंद्रराजे भोसले तसेच पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी संबंधित काम तातडीने पूर्ण करण्याचे आदेश दिले असल्याची माहिती आहे. मात्र प्रत्यक्षात कामाचा वेग वाढलेला दिसत नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी पसरली आहे.

जेवढं काम सुरू आहे ते तरी प्राधान्याने आणि सुरक्षिततेची काळजी घेत पूर्ण करा. किमान एक तरी प्रकल्प वेळेत पूर्ण करून नागरिकांना दिलासा द्या, अशी अपेक्षा महाबळेश्वरकर व्यक्त करत आहेत. प्रशासन आणि ठेकेदार यांच्याकडून तातडीने योग्य ती कार्यवाही होईल का, हे पाहणे आता महत्त्वाचे ठरणार आहे.